RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर  वर्ष ३४ वे  अंक १४० वा बुधवार, दिनांक २० ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक)  पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26  पृष्ठे – ६  मो:९४२२४७२५०२  किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
■ संपर्क ■
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

# दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर हल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर आज सकाळी त्यांच्या शासकीय निवासस्थानी झालेल्या साप्ताहिक जनसुनावणी दरम्यान एका व्यक्तीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे राजधानी दिल्लीत मोठी खळबळ उडाली असून, मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी हल्लेखोर आरोपीला तात्काळ अटक केली आहे.

गुरुवारी सकाळी मुख्यमंत्री रेखा गुप्ता या सिव्हिल लाइन्स येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी नागरिकांच्या



समस्या ऐकून घेण्यासाठी साप्ताहिक 'जनसुनावणी' घेत होत्या. यावेळी सुमारे ३५ वर्षीय एका व्यक्तीने तक्रार देण्याच्या बहाण्याने मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधला. त्याने आधी काही कागदपत्रे मुख्यमंत्री गुप्ता यांच्याकडे दिली आणि काही कळण्याच्या आतच त्याने त्यांच्यावर हल्ला केला. या अनपेक्षित हल्ल्यामुळे उपस्थित अधिकारी आणि नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला. सुरक्षा रक्षकांनी तात्काळ धाव घेत हल्लेखोराला पकडले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला ताब्यात घेऊन सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे.

**हल्ला करणारा कोण आहे?**

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर हल्ला करणारा राजेश भाई खिमजी भाई सकारिया हा गुजरातमधील राजकोट येथील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्याचा एक नातेवाईक तुरुंगात आहे, ज्याच्या सुटकेसाठी तो दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांकडे याचिका घेऊन आला होता. त्याला दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याने दिलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी गुजरात पोलिसांशीही संपर्क साधला आहे.

## उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक– एनडीए उमेदवार सीपी राधाकृष्णन यांचा अर्ज दाखल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एनडीएचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यापूर्वी त्यांनी संसदेच्या परिसरात असलेल्या महात्मा गांधीजींच्या पुतळ्याला पुष्प अर्पण केले. त्यांच्यासोबत २० प्रस्तावक आणि २० समर्थकांसह सुमारे १६० सदस्य उपस्थित होते. उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबर रोजी निवडणूक होणार आहे.

१७ ऑगस्ट रोजी झालेल्या भाजप संसदीय पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावावर एकमत झाले. भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी पत्रकार परिषदेत राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा केली.

त्यांचा सामना विरोधी आघाडीचे उमेदवार निवृत्त सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांच्याशी होईल. विशेष म्हणजे दोन्ही उमेदवार दक्षिणेतील आहेत. रेड्डी २१ ऑगस्ट रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील.

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणीही होईल. नामांकन दाखल करण्याची शेवटची तारीख २१ ऑगस्ट आहे. २५ ऑगस्टपर्यंत नामांकन मागे घेता येईल.

वास्तविक, २१ जुलैच्या रात्री जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होत आहे. ७४ वर्षीय धनखड यांचा कार्यकाळ १० ऑगस्ट २०२७ पर्यंत होता.

निवृत्त न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी हे विरोधी पक्षाचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार

१९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी भारताने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचा सामना एनडीएचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांच्याशी होईल.

७९ वर्षीय रेड्डी हे गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि गोव्याचे पहिले लोकायुक्त होते. ते मूळचे आंध्र प्रदेशचे आहेत. २००७ मध्ये त्यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

# ठाकरे बंधूंचे सर्व उमेदवार पराभूत

## बेस्टच्या पतपेढीच्या निवडणुकीत शशांक राव आणि प्रसाद लाड यांचे पॅनेल विजयी

**मुंबई/प्रतिनिधी :** बेस्टच्या पतपेढीच्या निवडणुकीत अनपेक्षित निकाल आला असून कामगार नेते शशांक राव यांच्या पॅनलचे १४ उमेदवार निवडून आले आहेत. तर आमदार प्रसाद लाड यांच्या पॅनलचे सात उमेदवार निवडून आले आहेत. ठाकरे बंधुंच्या पॅनलचा एकही उमेदवार जिंकून आलेला नाही. त्यामुळे बेस्टच्या पतपेढीवर राव यांच्या बेस्ट वर्कर्स युनियनची सत्ता आली आहे.

दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.ची पंचवार्षिक निवडणूक सोमवारी पार पडली. भर पावसाताही कामगारांनी प्रचंड प्रतिसाद दिला व तब्बल ८३ टक्के मतदान झाले. ही निवडणूक ठाकरे बंधू आणि भाजप विशेषतः आमदार प्रसाद लाड यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली होती.

पावसामुळे मतमोजणीला उशीर झाला होता व मंगळवारी मध्यरात्री उशीरापर्यंत मतमोजणी सुरू होती. या निवडणुकीत ठाकरे बंधू विरुद्ध आमदार प्रसाद लाड अशी प्रमुख लढत होईल अशी शक्यता वर्तवली जात होती. दोन्ही गटांकडून आपलाच विजय झाल्याचा दावा समाजमाध्यमांवरून केला जात होता. परंतु मतमोजणीचे कल पाहता खरी लढत प्रसाद लाड यांचे पॅनेल आणि शशांक राव यांच्या पॅनेल यांच्यातच झाली होती. निकालही तसेच आले आहेत. शशांक राव यांच्या पॅनलने कोणताही गाजवाजा न करता दणदणीत विजय मिळवला. तर ठाकरे बंधुंच्या पॅनलला एकही जागा मिळालेली नाही.

शिवसेनेच्या (ठाकरे) कामगार सेनेचे जास्तीत जास्त सदस्य हे या पतपेढीचे सभासद आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी ही निवडणूक सोपी होती. म्हणूनच कामगार सेनेने पॅनल तयार करताना अति आत्मविश्वासाने अनेक



निर्णय घेतले. तयारी न करताच ठाकरे बंधुचे एकत्र पॅनल जाहीर करणे, शिंदे यांच्या शिवसेनेतील एका महिलेला तिकीट देणे असे निर्णय घेतले. कामगार सेनेच्या विद्यमान संचालक मंडळाने केलेले गैरव्यवहार हे सुद्धा यावेळी प्रचाराच्या केंद्रस्थानी होते. त्याचाही फटका कामगार सेनेच्या पॅनलला बसला आहे. तर आमदार प्रसाद लाड हे पूर्ण ताकदीने पाच संघटनांसह उतरले होते.

ही निवडणूक म्हणजे मुंबई महापालिका निवडणुकीची रंगीत तालीमच मानली जात होती. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाकडे बेस्टच्या कामगारांबरोबरच राजकीय वर्तुळाचे आणि ठाकरे बंधूंच्या कार्यकर्त्यांचे व भाजपच्याही कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते.

बेस्ट उपक्रमाची सर्व आगरे आणि बेस्टची कार्यालये अशा ३५ केंद्रावर ही निवडणूक पार पडली. पतपेढीच्या १५,१२३ सभासदांपैकी १२,६५६ सभासदांनी मतदान केले. मंगळवारी वडाळा आगारात सकाळी ९ वाजता मतमोजणी होणार होती. मात्र पावसामुळे मतमोजणी करणारे अधिकारी वेळेवर पोहोचू शकले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात दुपारी दोन वाजल्यानंतर मतमोजणीला सुरूवात झाली. मतमोजणी रात्री उशीरापर्यंत सुरू होती. एकूण ३५ केंद्र आणि दीडशे उमेदवार असल्यामुळे मतपत्रिकांवरच्या या मतमोजणीला खूप विलंब झाला. निवडणुकीचा निकाल पहाटे जाहीर झाला.

# आलमला येथील विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलमध्ये कृष्णजन्माष्टमीचा अविस्मरणीय दहीहंडी सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल, लातूर येथे संस्थेचे सचिव तथा प्राचार्य बसवराज धाराशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद, उत्साह आणि बाल गोपाळांचा निरागस गोंगाट यामुळे विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल, लातूर येथे दिनांक १८/०८/२०२५ रोजी कृष्ण जन्माष्टमीचा दहीहंडी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेमधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गोपाळ गोपिकांच्या वेषभुषात सजुन मंचावर आले तेंव्हा प्रांगणात टाळयांचा कडकडाट झाला. गोविंदा रे गोपाळा या जयघोषात छोटया



गोविंदानी दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न करताच वातावरणात उत्साहाची लाट उसळली. मुलांच्या निरागस चेहयावर उमटलेले हास्य, पालक व शिक्षकांच्या डोळयात दाटलेला अभिमान तसेच कृष्ण भक्तीच्या गितांनी भारावलेले क्षण यामुळे संपुर्ण परिसर कृष्णमय झाला. या सोहळयानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार व वेषभुषा स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रशालेच्या प्राचार्यांनी सर्वांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा देत परंपरा आणि संस्कार यांचा वारसा पुढे नेण्याचे महत्व अधोरेखीत केले.

हा दहींदंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलच्या सांस्कृतीक विभागाच्या वतीने मेघा मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य संगमेश्वर धाराशिवे, प्रा. किशोर जेवे, प्रा. अमोल कुंभार, प्रा. अमित शिंदे, ऋतीक धाराशिवे, विकास सगरे, एस.आर. शिंदे, सोनाली स्वामी, राधिका गुरव, आर. आर. वाडकर, एस. सी. गवळी, ए.के. सोनवणे, एस. पी. माने, पि. एम. बिराजदार, पि.डी. मुसाने, एस. एस. देशपांडे, एन. एम. प्रयाग, पि. एच. घ्याडे, एस. के. क्षिरसागर, ए. डी. मुंढे यांनी परिश्रम घेतले.

# कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे सदभावना दिवस साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आधुनिक भारताचे शिल्पकार , माजी पंतप्रधान, भारतरत्न राजीव गांधीजी यांची जयंती सदभावना दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम इतिहास विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र देशमुख व प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे

यांनी राजीवजी गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

पंचायत राज कायद्याची अंमलबजावणी, युवकांना



मतदानाचा अधिकार आणि संगणकाचा वापर यासारखे अनेक क्रांतिकारी निर्णय घेऊन आपल्या भारत देशाला जागतिक महाशक्ती बनवण्याची प्रक्रिया सुरू करणारे आदरणीय राजीव गांधी दूरदृष्टीचे नेते होते. देशाच्या जडणघडणीतील त्यांचे योगदान आणि बलिदान कायम स्मरणीय आणि प्रेरणादायी राहील. अशा शब्दात कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजीवजी गांधी यांच्या कार्याचा गौरव केला.

सदभावना दिनाच्या निमित्ताने प्रा. महारुद्र बिडवे यांनी विद्यार्थ्यांना सदभावना दिनाच्या निमित्ताने शपथ दिली. यावेळी डॉ.कांतराव पोले, डॉ.दशरथ भिसे, डॉ. अभिजीत बादाडे, डॉ. अंगद कोते, डॉ.अजित भांजी, डॉ. माना गायकवाड, डॉ. शाहूराज मुळे, प्रा. विवेक गोस्वामी, प्रा. नंदा खरटमल, प्रा. शिल्पा हालसीकर, प्रा. अंकिता वाडकर, डॉ. मीनाक्षी कोंगे, डॉ. वैशाली माढेकर, डॉ जयदेवी पवार, डॉ. विवेक जाधव, प्रा. संदिपान चेवले, प्रा. ज्ञानदेव कांबळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता फुलगामे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व सल्लागार समिती, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**मुंबईत पावसाचा कहर मिठी नदीने धोक्याची पातळी ओलांडली...**

## चिमटा दयाचा



**पावसाने केला कहर! बोरगाव, धडकनाळ अंधारात !! जिल्ह्यात ७२५ हे. पिकाचे नुकसान !!! पूर्वपदावर येण्यास किती दिवस लागणार!!!!**

# काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ लातूर शहर, जिल्हा काँग्रेसची स्वाक्षरी मोहीम

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधीपक्ष नेते खासदार राहुल गांधी यांनी मतचोरी प्रकरणी सुरु केलेले आंदोलन देशातच नव्हे तर जगभरात गाजत आहे. राहूल गांधी यांच्या या आंदोलनाच्या समर्थनार्थ लातूर जिल्हा काँग्रेस व लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने दि. २१ ऑगस्टपासून संपूर्ण जिल्हाभर स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके व शहर जिल्हाध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

काँग्रेस नेते खासदार राहूल गांधी यांनी भारतीय निवडणुक आयोगावर गंभीर आरोप करीत निवडणुक आयोगाने भाजपाशी हातमिळवणी करुन देशभारात मतदान चोरी केल्याचा दावा केला आहे. महाराष्ट्रातील मतदार यादीतील घोटाळा आहे एक कोटी नवीन मतदार जादुने तयार झाल्याचा




दावा, बेगळुरुतील महादेवपुरा मतदारसंघात एकाच व्यक्तीची अनेकवेळा नोंदणी, एकाच प्रत्त्यावर असामान्य मतदार संख्या, एकाच व्यक्तीने अनेक वेळा मतदान केल्याचे आरोप, बिहारमधील एसआयआर आणि मतचोरीचा मुद्यावरुन राहूल गांधी यांनी बिहारमधून 'मतदार हक्क यात्रा' काढली. निवडणुक प्रक्रियेतील अनियमिततेवर प्रकाश टाकुन राहुल गांधी संविधान व लोकशाहीच्या रक्षणासाठी लढत आहेत, असे अभय साळुंके म्हणाले.

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यामध्ये शुक्रवारपासून स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे, असे नमुद करुन अभय साळुंके पुढे म्हणाले, पक्षाच्या ग्राम समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या माध्यमातून संपुर्ण जिल्हाभर घराघरापर्यंत जाऊन स्वाक्षरी मोहीम राबवली जाणार आहे. घरोघरी जाऊन राहूल गांधी यांच्या लढ्याची, मतदान चोरीची माहिती जनसामान्यांपर्यंत जाणार आहे. ॲड. किरण जाधव म्हणाले, लातूर शहरातील १८ प्रभागांत स्वाक्षरी मोहीम राबवली पोहोचवली जाणार आहे.

त्यासाठी बुथ प्रमुख, माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचे नियोजन करण्यात आले आहे. 'वोट चोरी के खिलाफ... राहुल गांधी के साथ', या आशयाचे पत्रक तयार करण्यात आहे. स्वाक्षऱ्यांचे संकलन करुन खासदार राहूल गांधी यांना सुपूर्त करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

काँग्रेस भवन येथे झालेल्या या पत्रकार परिषदेस महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा शीलाताई पाटील, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष इम्रान सय्यद, अनुसूचित जाती काँग्रेस विभागाचे शहराध्यक्ष प्रा प्रविण कांबळे, माजी उपमहापौर कैलास कांबळे, माजी नगरसेवक युनूस मोमीन, प्रविण सूर्यवंशी, ॲड. देविदास बोरुळे-पाटील, आकाश भगत, सुलेखा कारेपुरकर यांची उपस्थिती होती.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## निसर्गाच्या संकटाचा मुकाबला कसा करणार ?

आलिकडे मोठ्या प्रमाणात निसर्गाचे संकट येत आहेत. अचानक उद्‌भवणाऱ्या संकटाला तोंड देण्यासाठी मानव निर्मित उपयोजना कमी पडत आहे असे दिसून येत आहे. पाण्याचे संकट असो किंवा भुकंपाचे संकट असो ते मानव म्हणजे जीवास घातक ठरत आहे. त्यामुळे आता यापुढील काळ हा मोठ्या विचार करण्याचा असणार आहे. त्याच प्रमाणे नैसर्गिक संकटाचा मुकाबला कसा करावा याबाबत अभ्यासाची मोठी गरज आहे. उत्तरप्रदेश व जम्मूकाश्मीरात मोठे संकट येते. तसे निसर्गाची रचनाच आहे. त्यामुळे मानवाच्या हातीएक बाब आहे ती म्हणजे कशा प्रकारे कमीत कमी जीवसृष्टी वाचविता येईल. त्यासाठी नियोजनाबरोबर विज्ञानाची साथ घ्यावी लागणार आहे. महाराष्ट्रात जवळपास सर्वच नद्या ह्या भरल्या आहेत. यापेक्षा अधिक पाऊस झाला तर मोठे संकट निर्माण होवू शकते. अनेक ठिकाणी जे बंधारे आहेत त्याचे दरवाजे काही प्रमाणात उघडले आहेत. पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. त्यामुळे बंधाऱ्यास धोका होणार नाही. बंधारे अजून तरी सुरक्षित आहेत. पावसाचा कहर वाढल्याने व आगामी धोका टाळण्यासाठी मुंबई व परिसरातील शाळा बरोबर शासकिय, निमशासकिय कार्यालयास सुट्टी जाहिर केली आहे. कोकण, पुणे, मुबई व नासिक परिसर त्याच प्रमाणे पश्चिम महाराष्ट्रात पावसाने कहर केला आहे. या निसर्गाच्या संकटाशी मुकाबला करण्यासाठी अनेक उपयोजना आखण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी बचाव कार्याचे पथक तैनात करण्यात आले असून काही ठिकाणी बचाव कार्यसुरू आहे. बचाव कार्यामुळे जीवित हानी टाळली जात आहे. राज्यात सर्वाधिक नुकसान उभ्या पिकाचे व जमीनचे झाले आहे. जमीन वाहुन गेली आहे. जमीनीतील माती वाहून गेल्याने कस कमी झाला आहे. अनेक शेतकऱ्याने खडकाळ जमीनीवर शेकडो ट्रॅक्टरने माती टाकली आहे. पांढरी माती, बुरुजाची माती व नदीतील गाळ टाकण्यात आला होता, तो वाहुन गेला आहे. त्यामुळे जमीन नापीक होण्याची भीती आहे. जमीनीत उभे पीक होते ते जवळपास नष्ट झाले आहे. यावर्षी उन्हाळ्यात पावसाने बऱ्यापैकी हजेरी लावली होती. पेरण्यावेळेवर झाल्या होत्या, त्यामुळे पीक हाती लागणार तोच निसर्गाने हिरावुन घेतले आहे. सरकारने अजून पंचनामे करण्यात सुरवात केले नसले तरी ते करावे लागणार आहे. शेतकऱ्याची झालेले नुकसान भरपाई करणे अपेक्षित आहे. कारण शेतकरी हा अगोदरच संकटात सापडला आहे. त्यात चांगले पिक येवुन दसरा व दिवाळी चांगल्याप्रकारे साजरे करण्याचा विचार असताना अचानक मुसळधार पावसाने नुकसान केले आहे. पाऊस हा मोठ्या प्रमाणात हानी करीत आहे. मोठ्या शहरातील गटारी तुंबल्या आहेत. त्यामुळे शहरात साचलेले पाण्याचा निचरा होण्यासाठी मार्ग नसल्याने पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे. मोठ्या भुयारी गटारी असल्याने लहान मुले वाहून गेल्याच्या घटना घडू शकतात. जीव गमवावा लागेल. पाण्यात रस्त्यातीन खड्डा किती आहे याचा अंदाज येत नाही. त्यामुळे आपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या महिण्यात पावुस जसा सुरू आहे तसे रस्ता आपघाताचे प्रमाणात वाढ झाली आहे. ब्रेक लागले जात नाही. घसरगुंडी, चिखल साचल्याने आपघात होतात. असे असताना यावर्षी मोठ्या प्रमाणात अचानक पावुस पडत आहेत. मुळात आपल्या देशातील हवामान विभाग हा सक्षम असला पाहिजे. इतर देशातील हवामान विभाग व आपल्या देशातील हवामान विभाग यात तफावत आहे. जमीनीखालील होणाऱ्या हालचारी तातडीने कळाल्या पाहिजेत. बऱ्याच वेळा भुकंपाची पुर्व कल्पना नसल्याने जीवित व वित्त हनी होते. ते वाचविण्यात यश येत नाही. आता आगामी काळात किती वेळेत व किती वेगाने वारे वाहिले जाईल व पाऊस किती कोसळला जाईल याचा अंदाज आला पाहिजे. इतर देशापैकी अमेरिकेचे हवामान विभाग हा सक्षम आहे. त्याला जगात कोणत्या देशातील जमीनीतील हालचाली वाढल्या आहेत. याचा अंदाज येतो. हवामान विभागाचा अंदाज कळाल्यास नुकसान वाचवले जाऊ शकते. पुर्व सुचना मिळण्यासाठी सतर्क व सक्षम हवामान विभागाची गरज आहे. यापुढे आता नैसर्गिक हानी वाचविण्याची गरज आहे. तसे पाऊल उचलेले पाहिजेत. देशात विविध प्रांतात निसर्गरचना भिन्न आहे. उत्तराखंड, उत्तरप्रदेश, जम्मूकाश्मीरचा भाग अशा ठिकाणी निसर्ग कधी कोपला जाईल हे सांगता येत नाही. उत्तराखंड मध्ये पावसाने जमीन अचानक खचली जाते. त्याच प्रमाणे मोठ-मोठ्या बिल्डिंग ह्या खचल्या जातात. त्यावर उपयोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. वित्त हानी भरून काढता येवू शकेल मात्र जीवित हानी शक्य नाही. माणूस कसातरी जीव वाचऊ शकतो मात्र प्राणी कसे जीव वाचविणार? जनावरे यात दगावली तर मोठ्या प्रमाणात रोगराई पसरण्याची भिती असते. जनावरे मेल्यावर त्याची विल्हेवाट लावणे आवघड असते. एकदा का भुकंप झाला व पाऊस पडला तर सर्वात मोठे संकट हे रोगाराई पसरण्याचे आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत उद्‌भवणारे संकटाशी मुकाबला करणे आवघड आहे ते काम करणे दिव्य असले तरी प्रत्यक्षात बचाव कार्याच्यामदतीने केले पाहिजे. अचानक हवामानाचा बदलाचा हा परिणाम असल्याने पाऊस पडत आहे. सर्वांनी आपआपली काळजी घेणे आवशयक आहे. घराबाहेबर न पडत घरात राहाणे, प्रवास न करणे, हायस्पिडमध्ये गाड्या न चालविणे आवश्यक आहे. अचानक पावसाचे संकट निर्माण झाले आहे. त्यासाठी प्रत्येकांनी सरकार वेळोवेळी देत असलेल्या सुचनाचे पालन करावे. पाऊस अजून तरी थांबत नाही, तसे चिन्ह दिसून येत नाहीत. त्यासाठी स्वत:चा व जनावराचा बचाव कशाप्रकारे करता येईल याचा विचार केला पाहिजे. पावसाने आज पर्यंत झालेल्या विशेष करून शेतकऱ्याचे नुकसानीचा पंचनामे करावेत. त्याच बरोबर तातडीने काही रक्कम खात्यावर ॲडव्हांस जमा करावी लागेल तरच शेतकरी या पावसाच्या संकटातून सुटका, काही प्रमाणात होवू शकेल.

# सूर्यकांत जाधव यांना विभागीय डॉ.एस.आर. रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** आलमता,ता. औसा येथील विवेकानंद वाचनालयाचे ग्रंथपाल सुर्यकांत कमलाकर जाधव यांना सहचारिणी संगीता जाधव यांच्यासमवेत सन २०२३-२०२४ चा महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या ग्रंथालय संचालनालयाचा छत्रपती संभाजी नगर विभागीय डॉ. एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक(ग्रंथमित्र) पुरस्कार प्रदान रविवार,दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईच्या एसएनडीटी महिला मुक्त विद्यापीठ सभागृहात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोरे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्याध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार,उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी,उपसचिव अमोल मुत्याल,ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.२५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह,सन्मानपत्र,ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

सदरील कार्यक्रमाला राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील,राज्य कोषाध्यक्ष भीमराव पाटील,राज्य कार्योपाध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,जिल्हाध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर,लिपिक हिरालाल पाटील,नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सुर्यवंशी, बाळासाहेब देवणे, जिल्हा ग्रंथालय संघ संचालक किरण बाबळसूरे,



अनिल पाटील, गुरुपद सावळगे, शिवाजी मुळे, विवेकानंद वाचनालयाचे उपाध्यक्ष विश्वनाथ बिराजदार,दिलीप पाटील, मोहंमद शरीफ फाजल, रमाकांत देशपांडे, शिवरुद्रअप्पा धाराशिवे, दत्तात्रय कलूरे, एकनाथ कुंभार, ग्रंथालय विकास परिषदेचे विद्यासागर हणमंते, ग्रंथमित्र संतोष करमले, प्राचार्य मुळे, गिरीधर जंगाले, विद्याधर गायकवाड,होनमाडे, ग्रंथमित्र श्रीधर स्वामी, महादेव खिचडे, भीमराव पाटील,पवन गिरवलकर तसेच ग्रंथालय अधिकारी, कर्मचारी, ग्रंथालय कार्यकर्ते,ग्रंथालय कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना,ग्रंथमित्र पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करुन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे ४० टक्के अनुदान वाढ, वर्ग बदल, नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात शासन स्तरावर सुरु असलेल्या कारवाईची माहिती देत वाचकांना अधिकाधिक चांगले साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रंथालय चळवळीतील सर्वांनी प्रयत्न करावे असे आवाहन केले.

# रणसम्राट युवक प्रतिष्ठाणच्या वतीने २०० वृक्ष लागवड




**लातूर/प्रतिनिधी :** वृक्ष संवर्धन करणे काळजी गरज आहे आणि त्याचे संवर्धन प्रत्येकाने केलेच पाहिजे, वृक्षामुळे प्राणवायु मिळतो, हवा शुध्द राहते, कार्बनडाय ऑक्साईड कमी होतो त्याच बरोबर पाऊसही चांगला होतो. या सर्व बाबींना लक्षात घेता समाजातील रणसम्राट युवक प्रतिष्ठाण, लातूर यांच्या वतीने २०० वृक्ष लागवड करण्यात आले. सदरील वृक्ष बार्शी रोड मुख्य रस्त्याच्या बाजूला किया शोरुम परिसर, बिडवे कॉलेज समोरील भाजी मार्केटचा बाजूचा रस्ता या ठिकाणी लावण्यात आलेले असून तसेच वरवंटी ग्रामपंचायत परिसर या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी जिल्हा युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हाध्यक्ष प्रविण साळुंके यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी बोलताना रणसम्राट युवक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष म्हणाले की, वृक्ष माणसासाठी सर्वांत महत्वाचा घटकच बनला आहे. वृक्ष संपूर्ण सजीव सृष्टीचे संगोपन करते. वृक्षांची लागवड करणे म्हणजे मानवाला जणू जीवनच दिल्या सारखे आहे. महाराष्ट्र शासन दर वर्षी संपूर्ण राज्यात वृक्ष संवर्धन मोहिम राबवत असते त्याचाच एक भाग म्हणून आज आम्ही सर्व प्रतिष्ठाणच्या पदाधिकाऱ्यांनी संकल्प करुन २०० वृक्ष लावली आहेत. तसेच प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष जयद्रथ शिंदे यांनी संपुर्ण पृथ्वीचे संरक्षण जर कोण करत असेल तर ते वृक्षच करतात. समाजातल्या प्रत्येक घटकाने वृक्ष रोपण मोहिमेमध्ये भाग घ्यावा असे म्हटले.

यावेळी उपस्थित राचन्नावांगी, अजय शिराळ, दयानंद कलशेट्टी, भडंगे विशाल, ओमकार भडंगे, मारुती पिटले, अनिल धनेराव, शेंद्रे सर, बालाजी साबळे, शिवाजी शिंदे, सगरे मामा, शिवाभाऊ बडगे, संजूभाऊ राठोड, सोहेल भाई, प्रविण, श्रीनिवास डुमने, सोहेल शेख, अविनाश रोंगे, मोहन गायकवाड आदी उपस्थित होते.

## मंत्रिमंडळ निर्णय

### टाटा मेमोरिअल सेंटरच्या रायगड मधील कर्करोग संशोधन केंद्राच्या रुग्णालयासाठी मुद्रांक शुल्कात सवलत

टाटा मेमोरिअल सेंटर एकात्मिक आयुर्वेदिक कर्करोग दवाखाना आणि संशोधन केंद्राच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात तांबाटी (ता. खालापूर) येथे शंभर खाटांचे रुग्णालय उभारणार आहे. या रुग्णालयासाठी दिलेल्या १० हेक्टर जमिनीच्या भाडेपट्टा करारवरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्य शासनाने हे शंभर खाटांचे रुग्णालय उभारण्यासाठी तांबाटी ( ता.खालापूर, जि.रायगड) येथील दहा हेक्टर जमीन एक रूपया प्रतिवर्षी या नाममात्र दराने दिली आहे. या जमिनीच्या करारनाम्यावरील मुद्रांक शुल्कात सवलत मिळावी अशी विनंती टाटा मेमोरिअल संस्थेने केली होती. या रुग्णालयामुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागासह, लगतच्या शहरातील नागरिकांना कर्करोगा संदर्भातील उपचार व आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयातील १०० खाटांपैकी १२ टक्के खाटा समाजातील गरीब, दारिद्र्यरेषेखालील कुटुंब, शासकीय कर्मचारी या घटातील रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात. तसेच शासकीय योजनेनुसार कर्करोगावर सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून द्यावेत. रुग्णासोबतच्या एका व्यक्तीस अत्यल्प दरामध्ये रहिवासी सेवा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशा अटींसह या रुग्णालयाला मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली.

### कोल्हापुरातील सावित्रीबाई फुले सहकारी संस्थेस औद्योगिक वसाहतीसाठी जमीन

कोल्हापूर येथील सावित्रीबाई फुले महिला सहकारी औद्योगिक वसाहत लिमिटेड या संस्थेस कोल्हापूर मधील कसबा करवीर येथील अडीच हेक्टर जमीन महिलांची सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

कोल्हापूर येथील सावित्रीबाई फुले महिला सहकारी औद्योगिक वसाहत लिमिटेडच्या अध्यक्षांनी महिला सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी जागेची मागणी केली होती. या संस्थेच्या स्थापनेतून महिला उद्योजकांना निर्माण होणार आहेत. तसेच रोजगार संधीही उपलब्ध होणार आहे. हा उद्देश लक्षात घेता जाहीर लिलावाशिवाय ही शासकीय जमीन रेडी रेकनरनुसार येणारी रक्कम आकारून भोगवटादार वर्ग-२ म्हणून देण्यात येणार आहे. त्यासाठी यापुर्वीच निश्चित केलेल्या धोरणानुसार काही अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत.

### वेंगुर्ला तालुक्यातील कॅम्प गवळीवाडा येथील अतिक्रमण नियमित करण्यास मान्यता

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे वेंगुर्ला - कॅम्प गवळीवाडा येथील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे वेंगुर्ला येथील कॅम्प गवळीवाडा येथील चार ते पाच पिढ्यांपासून वास्तव्य करत असलेल्या कुटुंबांना दिलासा मिळणार आहे.

कॅम्प गवळीवाडा येथील स.न.४९१, हि.नं. १अ/१ मधील शासकीय जमिनीवर धार्मिक स्थळाचे अतिक्रमण वगळता उर्वरित ४२ स्थानिक रहिवाशांचे बांधकामाचे व मोकळे क्षेत्र असे एकूण २.९३.२० हे.आर. क्षेत्रावर अतिक्रमण आहे. हे अतिक्रमण १९०५ पूर्वीचे आहे. तसेच ते गाव अभिलेखात पीक पाहणीत दिसून येते. त्यामुळे येथील घरे, गोठ्याखालील व मोकळी जागा विचारात घेऊन पंधराशे चौ.फू. पर्यंतच्या जमिनीवरील अतिक्रमणे विनामुल्य नियमित करण्यास मान्यता देण्यात आली. पण पंधराशे चौ.फू. पेक्षा अधिकच्या अतिक्रमणाखालील जमिनीसाठी महसूल विभागाच्या दि. ४ एप्रिल २००२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दि.०१.०३.१९८९ या दिवशीच्या बाजारभाव किंमतीच्या अडीचपट रक्कम व त्यावर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने व्याज आकारणी करून, अतिक्रमणे नियमित करण्यात येणार आहे.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी ध्वजारोहण मा. श्री विशाल कोरे (असिस्टन्ट कमान्डन्ट आर. टी. सी., लातूर) (सी. आर. पी. एफ.), यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. श्री बाळासाहेब सोनवणे (असिस्टन्ट इंजिनिअर, एम. एस. इ. बी. हरंगुळ (बु.) लातूर.) मा. श्री अनिल पुरी (सामाजिक कार्यकर्ता, लातूर), मा. श्री किरण वाकुरे (माजी सरपंच १२ नं. लातूर), श्रीमती ज्योत्सना कोळपे (आरोग्य विभाग, लातूर), मा. श्री श्रीकृष्ण लाटे (अध्यक्ष, मातोश्री कलावती प्रतीष्ठान), मा. श्री रविशंकर मुंढे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, संगिता शेटे यांची प्रमुख उपस्थित होती.



शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्पीच कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले होते. या कॉम्पिटिशन मध्ये लहान गटामधून प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच मोठ्या गटामधून प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या विजेत्या सर्व स्पर्धकांचे प्रमुख पाहुण्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेच्या शिक्षिका नम्रता डांगे यांनी केले. तसेच स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचा समारोप केला. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# आ.अभिजीत पाटील यांच्या हस्ते किल्लारी शेतकरी सहकारी कारखाना च्या मिल रोलर पूजन संपन्न

**औसा/प्रतिनिधी :** किल्लारी सहकारी साखर कारखान्याचा गाळप हंगाम २०२५-२६ साठीचा मिल रोलर पूजन समारंभ शुक्रवार ( दि. १५ ) सायंकाळी ४.०० वाजता कारखाना परिसरात पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार तथा कारखान्याचे चेअरमन अभिमन्यू पवार हे होते. माढा विधानसभा सदस्य तथा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, पंढरपूरचे चेअरमन अभिजित पाटील, सतीश भोसले गुरुजी, प्रवीण फडणवीस, सभापती चंद्रशेखर सोनवणे, सुभाष जाधव, संतोष बेंबडे, काकासाहेब मोरे,शरद भोसले, डी.एल.पतंगे, युवराज बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले,



किल्लारी साखर कारखान्याच्या चिमणीच्या धुराचा संबंध थेट शेतकऱ्यांच्या चूलीशी आहे. किल्लारी करांचा भावनिक संबंध कारखान्याशी आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणूनच कारखाना सुरु केला आहे. निवडणुकीतील वचने पूर्ण करण्यासाठी स्वतःचे हमीपत्र दिले आहे.आमदार अभिजित पाटील म्हणाले, देशात सर्वाधिक साखर कारखाने सोलापूर जिल्ह्यात आहेत. सुर्याजी पाटलांचा मी तेरावा वंशज असून सन २००५ मध्ये ग्रामपंचायत लढलो, विविध प्रकारचे उद्योग सुरू केले. सुरुवातीला ऊस तोडणी टोळी केली. ज्या कारखान्यात ऊस टोळी चालवली त्या कारखान्याचा आज मी चेअरमन आहे. भूक, तहान, घर, झोप विसरून कारखान्याला वेळ दिला. पहील्या वर्षी दोन लाख गाळप केले. दोन वर्षात तीन कारखाने घेतली. दररोज तीन हजार टाक्या आक्सीजन तयार केला तो मोफत दिला. पाच वर्षात पाच कारखाने चालवले. कारखान्यावरील कर्ज फेडण्यास चार ते पाच वर्षांत आम्ही सक्षम होऊ शकतो. मात्र यासाठी आर्थिक शिस्त आवश्यक आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक प्रवीण फडणवीस यांनी केले. मनोगत व्यक्त करताना प्रवीण फडणीस, सतीश भोसले, काकासाहेब मोरे आदींनी आमदार पवार यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.पूजनानंतर ऊसगाळप हंगामाबाबत विश्वास व आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. असून कामगार व शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.सूत्रसंचालन सहाय्यक तुकाराम पवार यांनी केले. यावेळी सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व कामगार, ग्रामस्थ, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पावसाळ्यात त्वचा आणि केसांसाठी वरदान ठरतो कडुलिंब

मुंबई: पावसाळा सुरू झाला की, वातावरणातील ओलावा आणि आर्द्रता वाढते. यामुळे त्वचेच्या आणि केसांच्या अनेक समस्या उद्भवू लागतात. अशा वेळी, नैसर्गिक आणि गुणकारी उपाय म्हणून कडुलिंबाचा वापर करणे अत्यंत फायदेशीर ठरते. कडुलिंबामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल, अँटी-फंगल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म या समस्यांपासून तुमचे संरक्षण करतात.

त्वचेसाठी कडुलिंबाचे फायदे

बॅक्टेरियल आणि फंगल इन्फेक्शनपासून बचाव: पावसाळ्यातील दमट हवामानामुळे त्वचेवर खाज, पुरळ आणि फंगल इन्फेक्शनचा धोका वाढतो. कडुलिंबाच्या पानांचे पाणी गरम करून त्या पाण्याने आंघोळ केल्यास त्वचेवरील बॅक्टेरिया नष्ट होतात आणि इन्फेक्शनपासून बचाव होतो. मुरुमांवर उपचार: कडुलिंबाचा फेस पॅक मुरुमांवर रामबाण उपाय आहे. कडुलिंबाच्या पानांची पेस्ट मुलतानी माती आणि गुलाबजलमध्ये मिसळून चेहऱ्यावर लावल्यास मुरुम कमी होतात आणि त्वचा स्वच्छ राहते. त्वचेची स्वच्छता आणि चमक: कडुलिंबाच्या पाण्याने चेहरा धुतल्यास त्वचेवरील घाण, तेल आणि मृत पेशी निघून जातात. यामुळे त्वचा ताजीतवानी आणि चमकदार दिसते.

केसांसाठी कडुलिंबाचे फायदे:

कोंड्याची समस्या: पावसाळ्यात डोक्यातील कोंड्याची समस्या वाढते. कडुलिंबाच्या तेलाने किंवा कडुलिंबाच्या पानांच्या पेस्टने केसांच्या मुळांना मसाज केल्यास कोंडा कमी होण्यास मदत होते. कडुलिंबातील अँटी-फंगल गुणधर्म यासाठी विशेष उपयुक्त आहेत.केसांचे आरोग्य: कडुलिंबामुळे केसांचे कूप (षेश्रश्रळलश्रशी) मजबूत होतात, ज्यामुळे केसांची गळती थांबते. कडुलिंबाचा नियमित वापर केल्यास केस अधिक निरोगी आणि चमकदार बनतात.डोक्यातील खाज कमी: पावसाळ्यात दमटपणामुळे डोक्यात खाज येण्याची समस्या अनेकांना जाणवते. कडुलिंबाच्या पाण्याने केस धुतल्यास ही खाज कमी होते आणि डोक्याची त्वचा निरोगी राहते.

कडुलिंबाचा वापर कसा करावा?

आंघोळीसाठी: कडुलिंबाची काही पाने पाण्यात उकळून ते पाणी आंघोळीच्या पाण्यात मिसळा. यामुळे त्वचेवरील इन्फेक्शनचा धोका कमी होईल.

फेस पॅक: कडुलिंबाची पाने वाटून पेस्ट बनवा. यात हळद किंवा मुलतानी माती मिसळून चेहऱ्याला लावा. १५-२० मिनिटांनी चेहरा स्वच्छ धुवा.

केसांसाठी: कडुलिंबाच्या पानांची पेस्ट केसांच्या मुळांना लावून अर्धा तास ठेवा आणि नंतर केस धुवा. तसेच, कडुलिंबाचे तेल वापरूनही केसांचे आरोग्य चांगले ठेवता येते.

पावसाळ्याच्या दिवसात कडुलिंबाच्या या सोप्या उपायांमुळे तुम्ही तुमची त्वचा आणि केसांची योग्य काळजी घेऊ शकता.

# उपदेशकथा: वर्डस्वर्थची कविता

स्वामी विवेकानंदाचे नाव लहानपणी होते नरेंद्र. नरेंद्र ज्या महाविद्यालयात जात होता त्या ङ्गजनरल असेंब्ली कॉलेजफ्चे प्राचार्य होते विल्यम हेस्टी. नरेंद्राविषयी त्यांना अभिमान होता. एकदा ते वर्गात विल्यम वर्डस्वर्थची ङ्गएक्स्कर्शनफ ही सुप्रसिद्ध कविता शिकवीत होते. तीत ङ्गएक्स्टसीफ असा एक शब्द आहे. समाधीसारख्या या स्थितीत मनाची कोणती आणि कशी अवस्था असते हे ते रंगून जाऊन वर्णन करीत होते. ईश्वराप्रत जाऊन पोहोचलेल्या माणसाला ही अवस्था प्राप्त होते असे त्यांनी सांगितले. ङ्गईश्वरफ शब्द ऐकल्यावर नरेंद्र उभा राहिला आणि त्याने विचारले, ङ्गसर, आपण ईश्वराप्रत पोहोचलेले आहात का? आपण ईश्वर पाहिला आहे का?फ प्रा. हेस्टी म्हणाले, ङ्गनाही रे मित्रा, मी देव पाहिलेला नाही पण तुला याविषयीची खरोखरच आवड आणि कळकळ असेल तर तू दक्षिणेश्वराला जा. तेथील कालीमातेचा पुजारी रामकृष्ण परमहंस नावाचा आहे. त्याला अशी वारंवार समाधी लागते आणि त्याने देव पाहिला आहे असे म्हणतात.फ नरेंद्राने यापूर्वी केव्हातरी रामकृष्ण परमहंसांचे नाव ऐकले होते पण प्राचार्यांनी त्यांचा उल्लेख केल्यावर त्याची रामकृष्णांच्या भेटीची इच्छा अधिकच तीव्र झाली.

कथा उपदेश : आपल्या ध्येयाबद्दल आवड आणि कळकळ असेल तर तेथे पोचण्यासाठी मार्ग मिळतोच.

# पोट साफ होत नसेल तर सकाळी करा हा उपाय...

मुंबई: आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत बद्धकोष्ठता ही एक सामान्य समस्या बनली आहे. चुकीचा आहार, अपुरी झोप आणि बैठी जीवनशैली यामुळे अनेक लोक या समस्येने त्रस्त आहेत. सकाळी पोट व्यवस्थित साफ न झाल्यामुळे दिवसभर अस्वस्थता जाणवते. पण यावर एक सोपा आणि प्रभावी उपाय आहे - रात्री झोपण्यापूर्वी मनुका खाणे.

मनुके खाण्याचे फायदे:

बद्धकोष्ठतेपासून आराम: मनुकामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते. हे फायबर आतड्यांच्या कार्याला चालना देते, ज्यामुळे शौच सुलभ होते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो.

आतड्यांचे आरोग्य: मनुकातील सॉर्बिटॉल नावाचा नैसर्गिक घटक आतड्यांमध्ये पाणी खेचून घेतो, ज्यामुळे मल मऊ होण्यास मदत होते. यामुळे सकाळी सहजपणे पोट साफ होते.

पचन सुधारते: मनुका नियमित खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि पोटाचे आरोग्य चांगले राहते.

मनुका खाण्याची योग्य पद्धत: रात्री भिजत घाला: रात्री झोपण्यापूर्वी ५-६ मनुके पाण्यामध्ये भिजत घाला.

सकाळी खा: सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी हे मनुके चावून खा आणि ते पाणी प्या. यामुळे पचनक्रिया अधिक वेगाने काम करते.केवळ मनुकेच नाही तर सुक्या मेव्यामध्ये अंजीर, खजूर आणि जर्दाळू हे सुद्धा बद्धकोष्ठतेसाठी फायदेशीर आहेत. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि आतड्यांचे आरोग्य चांगले राहते. मात्र, कोणत्याही उपायाचा अवलंब करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे नेहमीच योग्य असते.



# पारद- शीं कारभाराची अपे-




**विरोधकांनी आता मतचोरीचा मुद्दा हाती घेतला आहे. याआधी त्यांनी ईव्हीएमला लक्ष्य केले होते. हरयाना आणि महाराष्ट्रातील दारूण पराभवानंतर त्यांनी मतपत्रिकेवर निवडणूक घेण्याचा आग्रह धरला. ईव्हीएमचा मुद्दा का सोडला, याचे समाधानकारक स्पष्टीकरण विरोधी पक्षांनी दिले पाहिजे.**



निवडणूक आयोग आणि विरोधी पक्ष; विशेषतः काँग्रेस, यांच्यातील संघर्ष टोकाच्या दिशेने चालला आहे. मतदार यादीत गोंधळ आहे आणि मतांची चोरी होते, असा आरोप लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केला. या पार्श्वभूमीवर बिहारमध्ये त्यांनी मतदार अधिकार यात्रेला सुरुवात केली आहे. बिहारमध्ये विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे. या यात्रेचा उद्देश निवडणुकीसाठी वातावरण तापविण्याचा आहे, असे मानले तरी निवडणूक आयोगावरील आरोपांचे गांभीर्य कमी होत नाही. बऱ्याच काळापूर्वी टी.एन. शेषन यांनी निवडणूक आयोगाचे अधिकार काय आहेत, हे दाखवून दिले. त्यावेळी आयोग चर्चेच्या केंद्रस्थानी आला होता. आता कारभाराच्या पद्धतीमुळे तो चर्चेत आला आहे. बिहारमध्ये मतदार याद्यांच्या फेरपडताळणीत ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. तो वादाचा मुख्य मुद्दा बनला आहे. हा वाद न्यायालयात गेला.

त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाने वगळलेल्या मतदारांची यादी काल प्रसिद्ध केली. मतदारांचे निधन, स्थलांतर, मतदार यादीत नावाची दुहेरी नोंदणी, अशा कारणांमुळे ही नावे वगळण्यात आल्याचे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. यंत्राद्वारे मतदार यादी वाचता येईल, अशा स्वरूपात उपलब्ध करून द्यावी, अशी विरोधकांची मागणी आहे. यातून मतदारांच्या गोपनीयतेचा भंग होऊ शकतो, अशी भूमिका निवडणूक आयोगाने घेतली. यासाठी आयोगाने सर्वोच्च न्यायालयाच्याच २०१९ मधील एका निकालाचा आधार घेतला.

तक्रारीची खातरजमा

मतचोरीचा मुद्दादेखील राहुल गांधी यांनी लावून धरला आहे. महाराष्ट्र आणि हरयानात मतदानानंतर झालेल्या चाचण्यांचे कल वेगळे होते आणि निकाल वेगळा आला, असे त्यांचे म्हणणे. कर्नाटकात वेगवेगळ्या बूथवरील मतदार याद्यांमध्ये एकाच व्यक्तीचे नाव आहे, असे त्यांनी सांगितले. मतचोरीचे केवळ आरोप करु नयेत, तर शपथपत्र देऊन तक्रार करावी, अशी भूमिका निवडणूक आयोगाने घेतली.

या तांत्रिक मुद्द्याला चिकटून राहण्याऐवजी आयोगाने तक्रारींची खातरजमा करण्यास प्राधान्य देणे आवश्यक होते. अद्यापही आयोगाने आपली भूमिका बदललेली दिसत नाही. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोप करतात; मात्र निवडणूक आयोगाकडून ते अपेक्षित नाही. 'काही पक्षांकडून चुकीच्या माहितीचा प्रसार केला जात आहे, निराधार आरोपांना आयोग घाबरत नाही', या शब्दांमध्ये आयोगाने आरोपांना प्रत्युत्तर दिले. या आरोपांच्या फैरींपेक्षा आपली कार्यपद्धती अधिकाधिक पारदर्शक कशी होईल, याकडे आयोगाने लक्ष देणे आवश्यक ठरते. निवडणूक आयोगाला घटनेने स्वायत्तता दिली आहे. तो राजकीय पक्षांकडून उपस्थित होणाऱ्या शंका आणि केले जाणारे प्रश्न यांना पाठमोरे होण्याचा परवाना नाही. निवडणूक काळात संकलित केला जाणारा सर्व प्रकारचा इलेक्ट्रॉनिक डाटा दीड महिन्यांच्या आत नष्ट करण्याचे आदेश निवडणूक आयोगाकडून राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना देण्यात आले. एवढी तातडी कशासाठी? बिहारमध्ये ऐन पावसाळ्यात मतदार याद्यांची पडताळणी करण्याचा निर्णय देखील शंका निर्माण करणारा ठरला. भारतीय लोकशाहीला जगात प्रतिष्ठा आहे. ती कमी करण्याचे काम आयोगाकडून होता कामा नये, किंबहुना त्यासाठी आयोगाने अधिक सजग राहण्याची गरज आहे. त्याऐवजी विरोधकांच्या आरोपांबद्दल निवडणूक आयोग अतिसंवेदनशील झाल्याचे चित्र पाहायला मिळते. मतदार याद्यांच्या पडताळणीबाबत राजकीय पक्षांना सुद्धा जबाबदारी टाळता येणार नाही. बिहारमध्ये मतदार यादी पडताळणी मोहिमेसाठी राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांकडून बूथ स्तरावर १ लाख ६० हजाराहून अधिक निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. ही संख्या कमी मानता येत नाही. असे असताना देखील याद्यांमध्ये, पडताळणी मोहिमेत त्रुटी राहात असतील, तर राजकीय पक्षांनी यासाठी आपली यंत्रणा अधिक मजबूत करणे गरजेचे वाटते. आताचे आरोप आणि तक्रारी याची आयोगाने सखोल चौकशी करून निष्कर्ष सांगावेत, ही सामान्य मतदारांची अपेक्षा आहे.


## डॉक्टर टीप्स



### शीघ्रपतन- एक सामान्य समस्या

खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.

डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्ट



खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते.

शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉक्टर लग्नाला दोन महिने झाले, पण शारीरिक संबंधात मी फारच कमी पडतो. मला तिचं समाधान करता येत नाही. मी फार आधीच संपतो. यामुळे मला आता रोज रात्री घरी जाण्याचीच भीती वाटते. आता तर माझ्यातलं पौरुषत्व संपल्यासारखं वाटतं. **(क्रमशः)**

## विनोद




आईने सोनूला विचारले, 'तू इथे ठेवलेली बिस्किटे खाल्लीस का?' सोनू म्हणाला, 'मी एकाला हात लावला नाही.' तेव्हा आई म्हणाली, 'इथे तर एकच शिल्लक आहे.' 'त्यालाच मी हात लावला नाही.' सोनू म्हणाला.

## संदेश

FARHAN & RANCHO
scooty pe Ghumne gaye..
Achanak RANCHO Urr gaya
Q?
Qki

Behti Hawa sa
tha w0
Urti Patang
sa tha W0
Ab Msg Padhna Band Karo Or
RANCHO kahan gaya usey DHUNDO...

## सुविचार




विज्ञानात आत्मज्ञान आले तर सर्वोदय होईल.
**- विनोबा भावे**

**संस्कृत सुभाषित**

**अधनाद्धि निर्वन्तते ज्ञातय: सुहृदो द्विजा :**
**अपुष्पाद्फलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिण:।।**
**(उद्योगपर्व, अध्याय ७२, ोक २० महाभारत)अर्थ :** ज्याप्रमाणे पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात, त्याप्रमाणे दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

## उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेट, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

## आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

## उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### द. आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाच्या घरच्या मैदानावर मिळवला वनडेमधील सर्वात मोठा विजय, केशव महाराज ठरला हिरो

दिल्ली-दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात टी-२० मालिकेनंतर वनडे मालिका खेळवली जात आहे. पहिल्या वनडेमध्ये दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा मोठा पराभव केला आहे. दक्षिण आफ्रिकेचा ऑस्ट्रेलियावर हा वनडेमधील धावांच्या फरकाने सर्वात मोठा पराभव आहे. केशव महाराजने कमालीचा स्पेल टाकत ५ विकेट्स घेत सामनावीर ठरला.

दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिल्याच वनडे सामन्यात गोलंदाजांचा दबदबा पाहायला मिळाला. शिवाय दोन्ही संघातील सलामीवीरांच शतक अवघ्या काही धावांनी हुकलं. तर फिरकीपटू ट्रॅव्हिस हेड आणि केशव महाराज यांनी फिरकीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला १९८ धावांवर सर्वबाद करत ९८ धावांनी मोठा विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेचा हा वनडेमधील ऑस्ट्रेलियावर सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी १९९४ मध्ये पर्थच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियावर ८२ धावांनी विजय मिळवला होता.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ८ बाद २९६ धावा केल्या. सलामीवीर एडन मारक्रम आणि रायन रिकल्टन यांनी चांगली सुरूवात केली. पण रिकल्टन ३३ धावा करत लवकर बाद झाला. मारक्रमने ८१ चेंडूत ९ चौकारांसह ८२ धावा केल्या. याशिवाय कर्णधार तेंबा बावुमाने ७४ चेंडूत ५ चौकारांसह ६५ धावांची खेळी केली. तर मॅथ्यू ब्रिटझकेने ५६ चेंडूत ७ चौकार आणि एका षटकारासह ५७ धावा केल्या. यानंतर ट्रॅव्हिस हेडने आफ्रिकेच्या टी-२० मालिकेतील शतकवीर डेवाल्ड ब्रेविसला ६ धावांवर बाद केलं. तर खालच्या फळीत वियान मुल्डरने ३१ धावांची खेळी करत संघाला ३०० धावांच्या जवळ नेलं. ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेडने ४ विकेट्स, द्वारशुईसने २ तर झाम्पाने १ विकेट घेतली.

आफ्रिकेने दिलेल्या ३०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरूवात केली, पण केशव महाराजने मात्र ऑस्ट्रेलियाच्या इतर कोणत्याच फलंदाजाला मैदानावर टिकू दिलं नाही. ट्रॅव्हिस हेडला २७ धावांवर सुब्रायणने बाद केलं. यानंतर केशव महाराजने मार्नस लबुशेन १ धाव, कॅमेरून ग्रीन ३ धावा, जोश इंग्लिस ५ धावा, तर एलेक्स कॅरीला खातदेखील उघडू न देता माघारी धाडलं. केशव महाराजने कमालीचा स्पेल टाकत संघाला विजयाच्या दिशेने नेलं. महाराजने १० षटकांत १ मेडन षटक टाकत ५ विकेट्स घेत ३३ धावा दिल्या.

यानंतर ऑस्ट्रेलियाच्या बेन द्वारशुईसने ३३ धावांची खेळी केली. तर मिचेल मार्शने ९६ चेंडूत १० चौकारांसह ८८ धावा करत बाद झाला. ऑस्ट्रेलियाचा संघाला दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी ४१ षटकांत १९८ धावांवर सर्वबाद केलं.

***

### रोहितला चॅम्पियन बनवले, गंभीरला आयपीएल जिंकवली; श्रेयसला तरीही आशिया कपमध्ये संधी नाही!

दिल्ली-येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया कपसाठी टीम इंडियाची घोषणा झाली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया खेळेल. तर शुभमन गिल याला संघात संधीच मिळाली नाही तर त्याला व्हाईस कॅप्टन्सी देखील देण्यात आली आहे. तसेच रिंकु सिंग याला देखील स्कॉडमध्ये जागा मिळालीये. अशातच ज्या खेळाडूला आशिया कपमध्ये संधी मिळेल, अशी पूर्ण शक्यता होती त्याच खेळाडूला डच्चू देण्यात आला आहे. टीम इंडियामध्ये श्रेयस अय्यर याला संधी मिळाली नाही.

श्रेयस अय्यरला संधी का नाही?अलीकडच्या काळात त्याने केलेली शानदार कामगिरी पाहता, त्याच्या निवडीची अनेकांना अपेक्षा होती. विशेषत: आयपीएलमध्ये त्याने पंजाब किंग्सचे यशस्वी नेतृत्व केलं आणि चांगला फॉर्म दाखवला. त्यामुळे, त्याच्या अनुपस्थितीमुळे अनेक क्रिकेटप्रेमींना आश्चर्याचा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे राखीव खेळाडूंच्या यादीत देखील श्रेयस अय्यरला संधी मिळाली नाही. अजित आगरकर म्हणाले... आशिया कप युएईमध्ये होत असल्याने श्रेयसला संधी मिळेल, अशी पूर्ण शक्यता होती. याच युएईमध्ये श्रेयसने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकवून दिली होती. मात्र, अखेरच्या क्षणी शुभमन गिलची एन्ट्री झाल्याने आता श्रेयसला बाहेरच बसावं लागतंय. तसेच शिवम दुबेला ऑलराऊंडर म्हणून संधी दिल्याने श्रेयसची जागा गेली का? असा सवाल देखील विचारला जात आहे. श्रेयस अय्यरच्या बाबतीत, तो कोणाची जागा घेऊ शकतो? असा सवाल अजित आगरकर यांनी प्रेस कॉन्फरेन्समध्ये विचारला. यात त्याची चूक नाही, पण आपलीही नाही, असंही ते म्हणाले.आशिया कपसाठी टीम इंडिया - सूर्यकुमार यादव (उरीरिळप), शुभमन गिल (तउ), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, वरूण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, रिंकू सिंग.

# वनडे वर्ल्डकप २०२५ साठी भारताचा संघ जाहीर

## हरमनप्रीत कर्णधार; स्मृती मानधनाच्या खांद्यावरही मोठी जबाबदारी





दिल्ली,१९ ऑगस्ट (पीएसआय)

आशिया चषकानंतर ३० सप्टेंबरपासून महिला वनडे विश्वचषक २०२५ खेळवला जाणार आहे. या स्पर्धेसाठी बीसीसीआयने १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. महिला एकदिवसीय विश्वचषकाचे यजमानपद भारताकडे आहे, तब्बल १२ वर्षांनी भारतात या स्पर्धेचं आयोजन केलं जात आहे. यापूर्वी भारताने २०१३ मध्ये ही स्पर्धा आयोजित केली होती. त्यावेळी भारत गट टप्प्यातच बाहेर पडला होता. भारतात होणाऱ्या या विश्वचषकात पाकिस्तानविरुद्धचे सामने श्रीलंकेत खेळवले जातील. यंदा टीम इंडिया विश्वचषकाच्या जेतेपदासाठी प्रबळ दावेदार बनू शकते. महिला एकदिवसीय विश्वचषक ३० सप्टेंबरपासून भारत आणि श्रीलंकेत खेळ-वला जाणार आहे. ही स्पर्धा ८ संघांमध्ये खेळवली जाईल. नीतू डेव्हिड यांच्या अध्यक्षतेखालील महिला निवड समितीने या स्पर्धेसाठी १५ खेळाडूंची निवड केली आहे. निवडीनंतर नीतू डेव्हिड यांनी पत्रकार परिषदेत संघाची घोषणा केली.

आयसीसी महिला विश्वचषक २०२५ साठी हरमनप्रीत कौर संघाची कर्णधार असेल. तर स्मृती मानधनाची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे, जी बऱ्याच काळापासून ही जबाबदारी सांभाळत आहे. तर प्रतीका रावल ही स्मृतीची सलामीची जोडीदार असेल. हरलीन देओल, दीप्ती शर्मा आणि जेमिमा रॉड्रिग्ज सारख्या स्टार खेळाडू देखील या संघाचा भाग आहेत. शफाली वर्माला मात्र भारताच्या संघात स्थान निर्माण करता आलेलं नाही. शेफाली वर्माची अलिकडची कामगिरी फारशी चांगली राहिलेली नाही, तिला संघातूनही वगळण्यात आले होते. ती सध्या भारतीय अ संघाबरोबर ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. याशिवाय ऋचा घोष, यस्तिका भाटिया यष्टीरक्षक म्हणून संघात आहेत. शिाय गोलंदाजीत रेणुका सिंह, अरूंधती रेड्डी, अमनजोत कौर, राधा यादव यांना संधी आहे. त्याचबरोबर संघात अष्टपैलू खेळाडूंची देखील आहेत.

महिलांच्या वनडे वर्ल्डकपसाठी भारताचा संघ-हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, रेणुका सिंग ठाकूर, अरुंधती रेड्डी, ऋचा घोष (यष्टीरक्षक), क्रांती गौड, अमनजोत कौर, राधा यादव, श्री चरणी, यस्तिका भाटिया (यष्टीरक्षक) आणि स्नेह राणामधील भारताचं वेळापत्रक

३० सप्टेंबर २०२५ - भारत वि. श्रीलंका

५ ऑक्टोबर २०२५ - भारत वि. पाकिस्तान

९ ऑक्टोबर २०२५ - भारत वि. ऑस्ट्रेलिया

१९ ऑक्टोबर २०२५ - भारत वि. इंग्लंड

२३ ऑक्टोबर २०२५ - भारत वि. न्यूझीलंड

२६ ऑक्टोबर २०२५ - भारत वि. बांगलादेश

## आयपीएल इतिहासातला महागडा खेळाडू, कोट्यवधींची

### तरी २४१ जणांकडून ३९९ रुपये का घेतो ऋषभ पंत?



मुंबई -टीम इंडियामधल्या सध्याच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक म्हणून ऋषभ पंतचे नाव घेतले जाते, खासकरून टेस्ट क्रिकेटमध्ये ऋषभ पंतने त्याच्या छोट्याशा करिअरमध्ये टीम इंडियाला ऐतिहासिक विजय मिळवून दिले आहेत. ऋषभ पंत हा आयपीएल इतिहासातला सगळ्यात महागडा खेळाडू आहे. आयपीएल २०२५ च्या लिलावात लखनऊ सुपर जाएंट्सने पंतला २७ कोटी रुपयांमध्ये विकत घेतलं. याशिवाय बीसीसीआयचं कॉन्ट्रॅक्ट आणि जाहिरातींमधूनही पंत कोट्यवधींची कमाई करतो, असं असलं तरीही पंत काही लोकांकडून ३९९ रुपये घेतो.बीसीसीआयने ऋषभ पंतला सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये ए ग्रेडमध्ये ठेवलं आहे, त्यामुळे त्याला वर्षाला ५ कोटी रुपये मिळतात. तसंच तो टीम इंडियासाठी जेवढ्या मॅच खेळतो त्यासाठी त्याला बीसी-सीआय वेगळी मॅच फी देखील देतं. एका टेस्टसाठी खेळाडूला १५ लाख रुपये, तसंच वनडेसाठी ६ लाख रुपये आणि टी-२०साठी ३ लाख रुपये मिळतात.

ऋषभ पंत का घेतो ३९९ रुपये?

ऋषभ पंत सध्या टीम इंडियाचा सर्वाधिक कमाई करणाऱ्या खेळाडूंपैकी एक आहे. असं असलं तरी तो २४१ जणांकडून ३९९ रुपये घेतो. इन्स्टाग्रामच्या माध्यमातून ऋषभ पंतची या २४१ जणांकडून दर महिन्याला ३९९ रुपयांची कमाई होते. हे २४१ जण ऋषभ पंतला इन्स्टाग्रामवर फक्त फॉलोच करत नाहीत, तर त्याचे सबस्क्रायबर्सही आहेत.या २४१ सबस्क्रायबर्सना ऋषभ पंत त्याचे खास फोटो आणि व्हिडिओही शेअर करतो, जे त्याच्या इतर १५ मिलियन फॉलोअर्सना बघायला मिळत नाहीत. एवढंच नाही तर पंतच्या सबस्क्रायबर्सने त्याला एखादा प्रश्न विचारला तर, पंत त्याला एक्सक्लुझिव्ह व्हिडिओच्या माध्यमातून उत्तर देतो. टीम इंडियाकडून असं करणारा पंत एकमेव क्रिकेटर आहे.

टीम इंडियाकडून १५० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय मॅच खेळणारा ऋषभ पंत सध्या मैदानातून बाहेर आहे. इंग्लंड दौऱ्यातल्या चौथ्या टेस्टमध्ये खेळताना ऋषभ पंतच्या पायाला दुखापत झाली होती, त्यामुळे तो ६ आठवडे बाहेर झाला आहे. इंग्लंड दौऱ्यातल्या ४ टेस्ट मॅचमध्ये त्याने ४७९ रन केले. आता २ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या भारत-वेस्ट इंडिज सीरिजमधून पंत मैदानात पुनरागमन करण्याची शक्यता आहे.

# आशिया कप २०२५ साठी टीम इंडियाची घोषणा! सूर्या करणार नेतृत्व



दिल्ली-दिनांक ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया कप २०२५ साठी बीसीसीआयने टीम इंडियाची घोषणा केली आहे. मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांनी पत्रकार परिषद घेऊन टीम इंडियाचा संघ जाहीर केला. ज्यात सूर्यकुमार यादवच्या खांद्यावर कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली असून, शुभमन गिल उपकर्णधार म्हणून भारताच्या टी २० टीमची कमान सांभाळेल. बीसीसीआयने जाहीर केलेल्या आशिया कप २०२५ साठीच्या टीममध्ये कोणकोणत्या खेळाडूंचा स्थान मिळाले आहे, याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया आणि निवड समिती यांच्यातील बैठकीनंतर आशिया कप २०२५ साठी निर्णायक संघ जाहीर करण्यात आला. आयपीएलमधील काही सिद्ध कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना यंदा दुर्लक्षित करण्यात आल्याचे दिसते, तर कमी प्रभावी कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. ज्यामध्ये शुभमन गिलला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, तर जसप्रीत बुमराहचा संघात समावेश करण्यात आला आहे. मात्र श्रेयस अय्यर आणि यशस्वी जयस्वालला संघात स्थान मिळू शकलेले नाही.

आयपीएल २०२५ मध्ये अय्यरने ६०४ धावा केल्या होत्या तर जयस्वालने ५५९ धावा केल्या होत्या. या दोघांची एकत्रितपणे, एकूण संख्या ११६३ पेक्षा जास्त होती. रिंकू सिंगने आयपीएल हंगामात खराब कामगिरी असूनही संघात स्थान मिळवले आहे. मात्र जयस्वालचा पाच राखीव खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला आहे.

आशिया कप २०२५ साठी टीम इंडियाचा संघ: सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षितराणा, रिंकू सिंग.

आशिया कप २०२५ बद्दल

यावर्षीचा आशिया कप ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर दरम्यान अबू धाबी आणि दुबई येथे खेळला जाणार आहे. तसेच यावेळी ही स्पर्धा टी-२० स्वरूपात असेल. विशेष म्हणजे, यावर्षी पहिल्यांदाच आशिया कपच्या इतिहासात आठ संघांचा समावेश करण्यात आला आहे. या आठ संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे. आधी लीग स्टेज सामने खेळवले जातील, ज्यामध्ये प्रत्येक संघ ३ सामने होतील. त्यानंतर अंतिम ४ ची फेरी होईल. यातील अव्वल संघांमध्ये २८ सप्टेंबर रोजी विजेतेपदाचा सामना खेळला जाईल.आशिया कपमध्ये टीम इंडियाचं वेळापत्रक भारतीय संघाला आशिया कपच्या गट अ मध्ये पाकिस्तान, ओमान आणि युएईसह स्थान देण्यात आले आहे. तर गट ब मध्ये श्रीलंका, बांगलादेश, हाँगकाँग आणि अफगाणिस्तानचे संघ आहेत. भारतीय संघ आपला पहिला सामना १० सप्टेंबर रोजी दुबईमध्ये युएई विरुद्ध खेळेल. त्यानंतर त्यांचा पुढचा सामना १४ सप्टेंबर रोजी दुबईमध्ये पाकिस्तान विरुद्ध होईल. भारतीय संघ आपला शेवटचा गट सामना १९ सप्टेंबर रोजी अबू धाबीमध्ये ओमान विरुद्ध खेळेल. आशिया कप दोन्ही गटातील टॉप-२ संघ सुपर-४ टप्प्यात पोहोचतील. त्यानंतर सुपर-४ टप्प्यातील टॉप २ संघांमध्ये जेतेपदाचा सामना खेळवला जाईल.

### बॉन्ड्री मागे घेतली होती.. सूर्याच्या टी-२० वर्ल्ड कप विनिंग कॅचवर अंबाती रायडूने चा खळबळजनक खुलासा

मुंबई-टीम इंडियाने २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर मिळवलेल्या विजयामागे सूर्यकुमार यादवने घेतलेला एक अविश्वसनीय झेल निर्णायक ठरला. त्याने डेव्हिड मिलरचा घेतलेला हा झेल विजयाचा टर्निंग पॉइंट मानला जातो. साऊथ अफ्रिकेचा पराभव करून टीम इंडियाने टी-२० वर्ल्ड कपवर नाव कोरलं होतं. सूर्यकुमार यादवच्या कॅचमुळे दक्षिण आफ्रिकेचा डाव अडचणीत आला आणि भारताने ७ रन्सनी रोमांचक विजय मिळवत १७ वर्षांनंतर टी-२० वर्ल्ड कप जिंकला होता. अशातच आता अंबाती रायडूने या विषयी खळबळजनक खुलासा केला आहे.

# श्रेयस अन् यशस्वीला का वगळले?

मुंबई-आशिया कप २०२५ साठी भारतीय संघाची अधिकृत १५ खेळाडूंची यादी जाहीर करण्यात आली आहे. शुभमन गिल याला उपकर्णधारपद देण्यात आलं असून, तो तब्बल वर्षभरानंतर पुन्हा ऊ२० संघात परतला आहे. तर सूर्यकुमार यादव हा कर्णधार असेल. मात्र या घोषणेनंतर सर्वाधिक चर्चा यशस्वी जायसवाल आणि श्रेयस अय्यर यांना डावलण्याच्या निर्णयाची होत आहे. मुख्य निवडकर्ते अजीत अगरकर यांनी या दोघांना संघात स्थान न देण्यामागचं स्पष्ट कारण पत्रकार परिषदेत सांगितले.

काय म्हणाले अजीत अगरकर?

शुभमन गिलबद्दल अगरकर म्हणाले की, ''गिलमध्ये आम्हाला नेतृत्वगुण दिसतात. इंग्लंडमध्ये त्याने अपेक्षेपेक्षा उत्तम कामगिरी केली. तो संघासाठी मोठा आधार ठरणार आहे.'' यशस्वी जायसवालबाबत विचारलं असता अगरकर म्हणाले, ''त्याचं वगळलं जाणं दुर्दैवी आहे. अभिषेक शर्माने सातत्याने चांगली कामगिरी केली आहे आणि त्याच्याकडे फिरकी गोलंदाजीचाही पर्याय आहे. त्यामुळे एकतर जायसवाल किंवा अभिषेक यापैकी एकालाच निवडता आलं असतं. यशस्वीची वेळ येईल, त्याला थांबावं लागेल.''श्रेयस अय्यर बाबत अगरकर म्हणाले की, ''त्याची कोणतीही चूक नाही आणि आमचंही काही चुकलं नाही. केवळ संघ संयोजन आणि परिस्थिती अशी होती.''

वॉशिंग्टन सुंदरला वगळण्यामागचं कारण काय?

अगरकर यांनी स्पष्टीकरण दिलं की, ''वॉशिंग्टन अजूनही आमच्या प्लॅनमध्ये आहे. हा अंतिम ऊ२० वर्ल्ड कप संघ नाही. कुलदीप, वरुण आणि अक्षर हे गेल्या काही काळापासून संघात आहेत.

# भारतीय खेळाडूची १२० गोल्ड मेडल्स चोरीला; पद्म पुरस्काराही चोरला...

**कोलकाता-** एखादं पदक जिंकणं सुद्धा किती कठीण असतं हे आयुष्यात कोणतंही पदक जिंकणारी व्यक्ती सांगू शकते. मात्र कष्टाने कमवलेली ही संपत्ती चोरीला गेली तर? असाच काहीसा धक्कादायक प्रकार भारतामधील एका महिला खेळाडूसोबत घडला असून तिच्या घरातून १२० गोल्ड मेडल्स चोरीला गेली आहेत. तसेच तिच्या घरातील पद्मश्री पदकाची प्रतिकृतीही चोरली गेली आहे.

कोण आहे ही खेळाडू?


मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी माजी राष्ट्रीय जलतरण विजेती बुला चौधरी यांच्या घरावर दरोडा पडला. हुगळी येथील बुला चौधरी यांच्या घरा-तून चोरट्यांनी पदकं चोरुन नेली. गेल्या दशकात दुसऱ्यांदा या जलतरणपटूच्या घरावर दरोडा पडला असून आता पडलेल्या दरोड्यामध्ये तिने जिंकलेली सुमारे १२० सुवर्णपदके आणि पद्मश्री पदकाची प्रतिकृती चोरली गेली आहे.

चोरीची माहिती कशी कळाली?

दक्षिण कोलकाता येथे राहणाऱ्या चौधरी यांनी,




''पश्चिम बंगालच्या हुगळी जिल्ह्यातील हिंदमोटर येथील एका शेजाऱ्याने मला घरी चोरी झाल्याची माहिती दिली. त्यांनी माझ्या घराच्या एका दरवाजाचे कुलूप तुटलेले पाहिल्यानंतर आम्हाला याबद्दल कळवलं,'' अशी माहिती रडत रडतच दिली. ही माहिती मिळताच बुला चौधरी आणि त्यांचे कुटुंब हुगळीमध्ये दाखल झाले. बुला यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला



आहे.

१५० पदके चोरीला

''मी माझ्या आयुष्यात विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये जिंकलेल्या १२० सुवर्णपदकांसह १५० हून अधिक पदके या चोरीत गमावली आहेत. या यादीत मी एसएएफ गेम्समध्ये जिंकलेल्या १० सुवर्णपदकांचा समावेश आहे,'' असं बुला चौधरी यांनी पत्रकारांना सांगितले आहे. दक्षिण



आशियाई खेळांना पूर्वी दक्षिण आशियाई फेडरेशन गेम्स किंवा एसएएफ गेम्स म्हणून ओळखले जात असे. ''घरात ठेवलेले अर्जुन पुरस्कार आणि तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहसी क्रीडा पुरस्कार अजूनही तिथेच आहेत. ते चोरीला गेलेले नाहीत,'' असेही बुला चौधरी यांनी सांगितले आहे.

कधी मिळालेला पद्मश्री?

मूळ पदकासह प्राप्तकर्त्यांना देण्यात येणाऱ्या पद्मश्री पदकाची प्रतिकृती देखील चोरीला गेली, असे बुला चौधरी यांनी सांगितले. बुला चौधरी यांना २००८ साली देशातील तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्यात आला.

आधीही पडलेला दरोडा

२०१५ साली मार्च महिन्याध्येही चौधरी यांच्या घरावर चोरट्यांनी दरोडा टाकलेला. या चोरीनंतर स्थानिक पोलिसांनी घराबाहेर रक्षक तैनात केले होते परंतु २०२१ मध्ये कोविड साथीच्या काळात ते काढून घेण्यात आले. ती आणि तिचे कुटुंब दर दोन ते तीन महिन्यांनी घरी येत होते. उत्तरपारा पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने या प्रकरणाबद्दल बोलताना, ''आम्ही गुन्हा दाखल केला आहे. तपास सुरू आहे,'' असं सांगितले.

आमदारही झाल्या

२००६ मध्ये चौधरी यांनी सीपीएमच्या तिकिटावर नंदनपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यांनी २०११ पर्यंत पश्चिम बंगाल विधानसभेत या जागेचे प्रतिनिधित्व केले.

## माजी सैनिकांनी ॲडव्हेंचर ट्रेनिंगची माहिती सादर करण्याचे आवाहन २२ ऑगस्टपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात संपर्क साधावा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांनी ॲडव्हेंचर ट्रेनिंग पूर्ण केलेली माहिती सादर करण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. यामध्ये बेसिक माउंटेनियरिंग कोर्स, ॲडव्हान्स्ड माउंटेनियरिंग कोर्स, पॅराग्लायडिंग, रिव्हर राफ्टिंग, स्विमिंग आदी क्षेत्रांतील तज्ज्ञता असलेल्या माजी सैनिकांचा समावेश आहे.

यानुसार, संबंधित माजी सैनिकांनी आपले डिस्चार्ज बुक, ओळखपत्र आणि ॲडव्हेंचर ट्रेनिंग कोर्स पूर्ण केल्याची कागदपत्रे घेऊन लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात २२ ऑगस्ट २०२५ पर्यंत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कर्ज योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन; ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२५

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या लातूर जिल्हा कार्यालयामार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजने अंतर्गत ९०, बीज भांडवल योजने अंतर्गत ९० आणि थेट कर्ज योजने अंतर्गत ३८ कर्ज प्रकरणांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध समाजातील इच्छुक लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत https://mahadisha.mpbcdc.in/schemes या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी कळविले आहे.

अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड, कोटेशन, प्रकल्प अहवाल, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, व्यवसायाचे परवाना (लायसन्स) आदी कागदपत्रांची छायांकित प्रत सादर करावी. या योजनांचा लाभ घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी इच्छुकांनी विहित कालावधीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

## महाराष्ट्रात उद्योगांना चालना देण्यासाठी 'मैत्री' कायदा !; एकल खिडकी योजनेमुळे उद्योजकांना परवानग्या मिळणार जलदगतीने

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राला देशातील आणि जगातील गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र बनवण्यासाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा' अर्थात 'मैत्री' कायदा-२०२३ लागू केला आहे. हा कायदा उद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी किंवा त्यांचा विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सरकारी परवानग्या आणि सेवा एकाच ठिकाणी जलदगतीने उपलब्ध करून देतो.

'मैत्री' कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये:

एकल खिडकी योजना: उद्योजकांना आता विविध सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत. सर्व परवानग्यांसाठी अर्ज करणे आणि त्यांची स्थिती तपासणे एकाच ऑनलाइन पोर्टलवर शक्य होईल. यामुळे वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होईल.

वेळेचे बंधन: प्रत्येक परवानगीसाठी निश्चित कालावधी ठरविण्यात आला आहे. जर संबंधित विभागाने या कालावधीत मंजुरी दिली नाही, तर अर्ज स्वयंचलितपणे मंजूर समजला जाईल.

पारदर्शकता आणि वेग: ऑनलाइन प्रक्रियेमुळे कामात पारदर्शकता येईल आणि अर्जाची स्थिती प्रत्येक टप्प्यावर तपासता येईल. तक्रार निवारण: कोणत्याही अडचणी किंवा विलंबाच्या बाबतीत तक्रार निवारणासाठी दोन विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.अधिकार प्रदत्त समिती आणि पर्यवेक्षकीय समिती. या कायद्यामुळे महाराष्ट्रात गुंतवणुकीला चालना मिळेल, नवीन रोजगारांच्या संधी निर्माण होतील आणि राज्याची व्यवसाय सुलभता वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. लहान-मोठे उद्योजक, नवउद्योजक आणि परदेशी गुंतवणूकदारांना याचा मोठा लाभ होणार आहे. उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक माहिती आणि मार्गदर्शनासाठी उद्योग विभागांतर्गत 'मैत्री सेल'मार्फत कॉल सेंटर सुविधा उपलब्ध आहे. यासाठी टोल-फ्री क्रमांक १८०० २३३ २०३३ किंवा ०२२-२२६२२३२२, ०२२-२२६२२३६१ यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांनी केले आहे.

## दयानंद विज्ञानमध्ये संगणकशास्त्र विभागातील प्लेसमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील बी.एस्सी.सी.एस.तृतीय वर्षातील आदिनाथ जाधव व बी.एस्सी.सी.एस.द्वितीय वर्षातील गणेश मठपती हे दोन विद्यार्थी लातूर येथील इंडोव्हेट टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून नोकरीत रुजू झाले आहेत.या प्लेसमेंटबद्दल महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते या दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या दोन्ही विद्यार्थ्यांना संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी संगणकशास्त्र विभाग समन्वयक डॉ. संगीता जाजू,डॉ.महेश करळे,प्रा.सुजाता काळे,प्रा.वैभव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# मध्य रेल्वेवर मुसळधार पावसाचे आव्हान असताना - अखंडितपणे रेल्वे सेवा चालवण्यात आली



**मुंबई/प्रतिनिधी :** रेल्वे मुंबई शहराची जीवनरेखा आहे, विशेषतः उपनगरी सेवा जी दररोज लाखो प्रवाशांचे परिवहन करते.

मुंबईत पावसाळा इतका मुसळधार असतो की अनेकदा रस्त्यांवर पाणी साचून, पूरस्थिती निर्माण होते आणि त्यामुळे रेल्वेसेवा विस्कळीत होते.

मुंबई शहरात रेड अलर्ट जारी करण्यात आला असून दादर, माटुंगा, शीव, कुर्ला, विक्रोळी, घाटकोपर, कांजुरमार्ग, मुलुंड, मानखुर्द आणि पनवेल या भागांमध्ये जोरदार पाऊस पडत आहे. त्यापैकी विक्रोळी येथे आज दि. १८.०८.२०२५ रोजी आतापर्यंत २०० मि.मी. पेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे.

मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवरही मध्य रेल्वेने उपनगरी सेवा अखंडितपणे सुरू ठेवली आहे. मुंबई विभागाने केलेल्या व्यापक मान्सूनपूर्व कामांमुळे व्यापक नेटवर्क मधील सेवा सुरळीत व सुरक्षित राहाव्यात यासाठी पूर्ण प्रयत्न केले आहेत.

आज सकाळपासून सुरू असलेल्या सततच्या मुसळधार पावसातही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण दरम्यान मध्य रेल्वेची उपनगरी सेवा सुरळीतपणे सुरू आहे.

ट्रॅक योद्ध्यांकडून महत्त्वाच्या ठिकाणांवर लक्ष

ट्रॅक योद्धे महत्त्वाच्या ठिकाणी साचलेल्या पाण्यावर तिरंगी मोजपट्टीच्या साहाय्याने बारकाईने लक्ष ठेवून आहेत. ही तिरंगी मोजपट्टी म्हणजेच पाण्याची पातळी दाखवणारा निर्देशक आहे ज्यात हिरवा, पिवळा आणि लाल असे रंग दर्शविलेले आहेत. हिरवा रंग म्हणजे वाहतूक सुरळीत सुरू असल्याचे, पिवळा रंग म्हणजे काळजीपूर्वक गतीमान होण्याचे तर लाल रंग म्हणजे पूर्णपणे वाहतूक बंद असल्याचे सूचित करतो.

वाढीव पंप यंत्रणाधोकादायक ठिकाणी कार्यक्षम व सतत पंप चालू राहतील याची खात्रता ठेवली.

पूरनियंत्रण गेट्सचे कार्यक्षम व्यवस्थापन

रेल्वे परिसरात पाणी साचू नये म्हणून पूरनियंत्रण गेट्स वेळेवर उघडून/ बंद केले जात आहेत याची खात्री केली जात आहे.

गरज भासल्यास लहान तात्पुरते नाले तयार करणे

परिस्थितीनुसार त्वरित पाणी वाहूनजावे यासाठी नवीन लहान नाले तयार करणे

मानखुर्द, गोवंडी, कुर्ला आणि टिळकनगर या सखल भागांत पाणी साचल्यामुळे हार्बर मार्गावरील गाड्या ५ ते ८ मिनिटे उशिराने धावत आहेत.

मुख्य मार्गावरील सेवाही मुसळधार पावसामुळे कमी स्पष्टतेमुळे विविध विभागांत १० ते १२ मिनिटांनी उशिराने धावत आहेत.

सर्व संबंधित रेल्वे कर्मचारी सतर्क राहून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवत आहेत. मुसळधार पावसातही पाणी साचणे, पूरस्थिती निर्माण होणे, तांत्रिक बिघाड किंवा इतर बिघाड टाळण्यासाठी प्रयत्नशील आहेत, जेणेकरून प्रवाशांचा प्रवास सुरळीत आणि सुरक्षीत राहील.

## प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना म. की. सबनीस राज्यस्तरीय सदभावना पुरस्कार जाहीर



**अंबाजोगाई /प्रतिनिधी :** योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार संस्था, आंबेजोगाई आणि जय हिंद ग्रुप, आंबेजोगाई यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा भ. की. सबनीस राज्यस्तरीय सदभावना पुरस्कार लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांना जाहीर झालेला आहे जय हिंद ग्रुप चे सचिव व अध्यक्ष यांनी हा पुरस्कार जाहीर केला.

प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांनी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सदस्य आणि महाराष्ट्र शासन तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश समिती अध्यक्ष म्हणून त्काम केलेले आहे. ते नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता डीन म्हणून देखील कार्य केलेले आहे. त्यांनी आठ ग्रंथाचे लेखन व ५० ग्रंथाचे संपादन केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ११ संशोधक विद्यार्थ्यांना पीएच.डी.व पाच विद्यार्थ्यांना एम फिल पदवी प्राप्त झालेली आहे. ते महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार, फुले आंबेडकर साहित्य पुरस्कार, प्राचार्य टी एस कडगे आदर्श प्राचार्य पुरस्कार आणि महाराष्ट्र फाउंडेशनचा ५० हजार रुपयेचा पुरस्कार आदी विविध पुरस्काराने ते सन्मानित आहेत.

## लातूर जिल्ह्यात पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतला आढावा

### बॅरेजस दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सततच्या पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आणि उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्याकडून आज सकाळी दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. तसेच, नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

पालकमंत्र्यांनी प्रशासनाला पूरपरिस्थिती, रस्ते वाहतूक, आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. जिल्ह्यातील नद्या, नाले आणि धरणांच्या पाणीपातळीवर लक्ष ठेवण्यासह, आवश्यक त्या ठिकाणी मदतकार्य वेगाने राबवण्याचे, नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे आदेशही त्यांनी दिले. तसेच एकही नुकसानग्रस्त शेतकरी, नागरिक मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी प्रत्यक्ष फिल्डवर राहून नागरिकांना आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करावे, असे पालकमंत्री म्हणाले.

येत्या काही दिवसांत मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नदी, नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन पालकमंत्र्यांनी केले आहे. विशेषत: नदीकाठावरील गावांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. पुराच्या पाण्यातून प्रवास करणे टाळण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवली असून, नागरिकांना आवश्यक ती सर्व मदत पुरवण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जात असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी सांगितले. तसेच जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीची, तसेच त्या अनुषंगाने प्रशासनामार्फत करण्यात येत असलेल्या मदतकार्य, नुकसानीचे पंचनामे आदी बाबींची माहिती दिली.

बॅरेजस देखभाल, दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करण्यासाठी पाठपुरवा

लातूर जिल्ह्यातील काही बॅरेजसची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याची बाब जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. या कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## मालमत्ता कर शास्ती माफी योजनेस प्रचंड प्रतिसाद

- १००% शास्ती माफी योजनेस ४ दिवसांची मुदतवाढ
- शेवटच्या दिवशी ४०० थकबाकीदार मालमत्ता धारकाकडून तब्बल सव्वा कोटी कर संकलन

**लातूर/प्रतिनिधी :** महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकाकडून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात १००% कर वसुली करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी कर संकलन विभागास दिले होते. त्यादृष्टीने उपायुक्त(महसूल) डॉ पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभाग वर्षाच्या सुरुवाती पासूनच टॅक्स वसुलीच्या दृष्टीने विविध उपक्रम/योजना राबवित आहे.. त्यानुसार मालमत्ता धारकाना विविध सूट/सवलती देण्यात आले होते. सोबतच थकबाकीदार मालमत्ता धारक यांच्याकडील थकीत कराची रक्कम पाहता १००% शास्ती माफी योजना संपूर्ण मालमत्ता धारकासाठी लागू करण्यात आली होती. त्यामध्ये तब्बल २१०० थकबाकीदार मालमत्ता धारकानी शास्ती सूट चा लाभ घेत ४.७३ कोटी चा कर संकलन करण्यात कर विभाग यशस्वी झाला आहे.. १००% शास्ती माफी योजना मधे अधिकाधिक नागरीकाना सहभागी होता यावे या दृष्टीने क्षेत्रीय अधिकारी बंडू किसवे , श्री संतोष लाडलापुरे , श्री समाधान सूर्यवंशी , श्री राजुरे यांच्यासह सर्व कर पर्यवेक्षक व वसुली लिपिक यांनी अथक परिश्रम घेतले.




सदरील सुट ला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून सर्व क्षेत्रीय कार्यालयात नागरिकानी टॅक्स भरणा करण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.. सदरील योजनेस मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद पाहता व काही नागरिकांना वैयक्तिक अडचणी मुळे लाभ घेता आला नसल्याने व त्यांची मागणी असल्याने सदरील योजनेस ४ दिवस मुदतवाढ देण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी घेतला आहे. त्यादृष्टीने सर्व क्षेत्रीय कार्यालयात किंवा ऑनलाइन पद्धतीने मुदतवाढ दिलेल्या १००% शास्ती माफी योजना या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन टॅक्स भरून महांपलिकेला सहकार्य करावे असे आव्हान उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे

## मोकाट कुत्रे व मोकाट जनावरे यांचा योग्य ते बंदोबस्त करा अन्यथा हीच जनावरे नगरपालिकेत सोडू - मुजीब सौदागर



**निलंगा/प्रतिनिधी:** निलंगा शहरात मोठ्या प्रमाणावर मोकाट कुत्रे तसेच मोकाट जनावरे फिरत असल्याने त्यांचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.शिवाय गेल्या काही दिवसातच मोकाट कुत्र्यांनी जवळपास १८ जणांचा चावा घेतला आहे ज्यात जास्त प्रमाणात लहान मुले व विद्यार्थी यांचा समावेश आहे.

तसेच शहरात मोकाट जनावरे ही मोठ्या प्रमाणात फिरत असून हीच जनावरे नागरिकांच्या अंगावर येतात ज्यामुळे नागरिकांच्या जीवास मोठा धोका होऊ शकतो हीच जनावरे रस्त्याच्या मध्यभागी समूहाने उभी राहून तर कधी रस्त्याच्या मध्यभागी समूहाने बसलेल्या असतात त्यामुळे रहदारीस मोठा अडथळा निर्माण होतो,तर कधी एकमेकात ही भांडतात त्यात वाहनाचे अनेक वेळा नुकसान झाले आहे आता पुढे पोळा, गणेशोत्सव,गौरीपूजन अनेक सन आहेत ज्यामुळे शेतकरी,महिला भगिनी, नागरिक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत येतात त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन व तत्काळ निवेदनाची दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी तसे नाही झाल्यास येणाऱ्या २५ तारखेला सोमवारी सदरील मोकाट जनावरे नागपालिकेत सोडून निषेध करण्यात येईल असा इशारा युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब सौदागर यांनी मंगळवारी निवदणाद्वारे मुख्याधिकारी यांच्या कडे दिला आहे


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## ह भ प संगीताताई वैद्य यांना हार्मोनियम शाल श्रीफळ देऊन

# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते सन्मान

**लातूर/प्रतिनिधी** : राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त काढण्यात आलेल्या ज्ञानोबा तुकोबा समता दिंडी मध्ये चालत पायी १३ दिवस तुळशी वृंदावन डोक्यावर धारण करून पाई प्रवास करणाऱ्या ह. भ. प. सौभाग्यवती संगीताताई गणेश वैद्य यांचा राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांचे हस्ते हार्मोनियम, शाल, श्रीफळ देवून आशियाना बंगल्यावर सत्कार करण्यात आला. ज्ञानोबा तुकाराम पायी समता दिंडीचे आयोजक ह. भ. प. शरद देशमुख महाराज यांनी या दिंडी चे आयोजन केले होते

यावेळी ह.भ. प. भारत महाराज डोंगरे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, रेनाचे चेअरमन अनंतराव देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, मारुती महाराज साखर कारखान्याचे माजी चेअरमन गणपतराव बाजुळगे, जिल्हा बँकेचे संचालक पृथ्वीराज सिरसाठ, जिल्हा बँकेचे संचालक ड राजकुमार पाटील, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, रेणाचे संचालक रणजीत पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते चांदपाशा इनामदार, मांजराचे माजी संचालक ज्ञानेश्वर भिसे, प्रा. शिवाजी कांबळे, अशोकराव पाटील उमरगेकर, निवाड्याचे सरपंच दिनेश साळुंके, गोविंद केंद्रे चाकूर, अण्णासाहेब शिंदे इत्यादी व अनेक मान्यवर उपस्थित होते.



### सायबर सुरक्षेचे धडे - विद्या प्राथमिक विद्यामंदिर येथे सायबर वॉरियर्सचे सत्र

**लातूर/प्रतिनिधी** : राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ऊलशी डहळज्ञीहर षी ऊलशी डीीरज्ञीहर या उपक्रमांतर्गत विद्या प्राथमिक विद्यामंदिर, लातूर येथे सायबर सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी आणि अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग मेसेजची ओळख, पासवर्डची सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक टाळण्याचे मार्ग तसेच सायबर गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया व हेल्पलाईन १९३० याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शुभांगी चौधरी, सहसचिव श्री. विजय यादव, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची जाणीव निर्माण झाली असून ते आता इंटरनेटचा वापर अधिक सजगतेने आणि सुरक्षिततेने करतील, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.

## जवळगेकर कुटुंबांचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी** : शहर काँग्रेसचे सरचिटणीस सेवा निवृत्त प्राध्यापक डॉ शिवाजीराव जवळगेकर यांच्या पत्नी सौ कांचन शिवाजीराव जवळेकर यांचे दोन दिवसापूर्वी दुःखद निधन झाले त्याबद्दल सोमवारी सायंकाळीं सहा वाजता राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी जवळगेकर यांच्या लातूर येथील निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले कुटुंबांना धीर दिला

यावेळी डॉ शिवाजीराव जवळगेकर, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, सचिन दाताळ प्रा.अमोल शिंदे , रामदास पवार अंगद वाघमारे, यांच्यासह मोठे भाऊ बाबुराव जवळगेकर, इंद्रजित जवळगेकर, गुलाबबाबा कांबळे,



नारायण कांबळे,मुलगी स्वाती जवळगेकर अमृता जवळगेकर, मुलगा ऋषिकेश जवळगेकर, जावई दिगंबर जेवरीकर, अमित मेकाले यांच्या सह राजू कांबळे, सौरभ म्हेत्रे, मुकेश पंदीकोन्दे, जवळगेकर कुटुंबिय उपस्थित होते

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजनांसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि त्याअंतर्गत कार्यरत १३ उपकंपन्यांमार्फत इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. लातूर जिल्हास्तरावर या योजनांचे कामकाज कार्यान्वित करण्यात आले असून, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी विविध योजनांसाठी पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन योजनांमध्ये २० टक्के बिज भांडवल कर्ज योजना, १ रुपये लाख थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना आदी योजनांचा समावेश आहे. या सर्व योजना पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात असून, इच्छुक अर्जदारांनी महामंडळाच्या www. msobcfdc.org या अधिकृत वेबपोर्टलवर आवश्यक कागदपत्रांसह नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच ऑफलाईन योजनांमध्ये उर्वरित बिज भांडवल योजना, थेट कर्ज योजना या दोन योजनांचा समावेश आहे. या ऑफलाईन योजनांसाठी महामंडळाच्या लातूर जिल्हा कार्यालयात अर्ज उपलब्ध आहेत. अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा कार्यालयात अर्ज सादर करावेत.

योजनांबाबत अधिक माहितीसाठी अर्जदारांनी जिल्हा कार्यालय, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुनी डाल्डा फॅक्ट्री, शिवनेरी गेट समोर, लातूर येथे किंवा ०२३८२-२५३३३४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

### लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी २.१ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यात २० ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी २.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये शिरूर अनंतपाळ तालुक्यात सर्वाधिक ४.६ मिलीमीटर, तर उदगीर तालुक्यात सर्वात कमी ०.५ मिलीमीटर पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- १.६, औसा- ३.४, अहमदपूर- १.२, निलंगा- ४.२, उदगीर- ०.५, चाकूर- १.०, रेणापूर- ०.६, देवणी- १.४, शिरूर अनंतपाळ- ४.६ आणि जळकोट- १.२ मिलीमीटर.

# राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा ; संगणक कक्षाचे उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी** : पटेल नगर येथील राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष उद्धवराव जाधव साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका अरुणा पवार, भारुडकार बालाजी गाडेकर उपस्थित होते. प्रशालेच्या प्रांगणात श्रीमती वर्षा दैठणकर व गोविंद मुस्कावाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर उत्कृष्ट लेझीम नृत्य सादर केले. अध्यक्षांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी शालेय परिपाठातून समाजासाठी आणि देशासाठी कार्य करण्याची प्रेरणा घ्यावी असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका गडकर यांनी केले तर आभार संजयकुमार बेलुरे यांनी मानले. यावेळी मुख्याध्यापक विकास तोडकर, गोविंद मुस्कावाड, निवृत्ती जाधव, सरस्वती केंद्रे, वर्षा दैठणकर, सुरेखा भुरे सह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संगणक कक्षाचे उद्घाटन

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नव्याने तयार करण्यात आलेल्या संगणक कक्षाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमास उपस्थित पालकांना व विद्यार्थ्यांना संगणकाचे फायदे व माहिती यावेळी देण्यात आली. परिसरातील पालकांनी संगणक कक्ष उभारल्याबद्दल शाळेचे कौतुक करून शाळेच्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले.




टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


### स्नेहलता ब्युटी पार्लरचे शानदार उद्घाटन संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** : अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज स्नेहलता मेकओव्हर ब्युटी पार्लर चे उद्घाटन लातूर येथील फेमस ब्युटी मेकअप आर्टिस्ट सौ.रुपाली सोलंकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. विशेष म्हणजे, लातूर शहरातील प्रसिध्द मेकअप आर्टिस्ट सौ.रुपाली सोलंकर यांनी ग्रामीण परिसरातील विद्यार्थिनींना संधीची सुरुवात केल्यामुळे त्यांचे महिला वर्गातून कौतुक केले जात आहे.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी लातूर शहरातील प्रसिद् मेकअप आर्टिस्ट रुपाली सोलंकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रक्षा रेड्डी, निकिता शेवाळे, रितिषा रेड्डी होत्या. सदरील मान्यवरांच्या हस्ते या अद्यावत ब्युटी पार्लरचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर मेकअप आर्टिस्ट रुपाली सोलंकर यांनी महिलांच्या सौंदर्याबाबत जागरुकता वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आणि कोकळगाव सारख्या ग्रामीण भागात अशा दर्जेदार सेवांची उपलब्धता होणे हे कौतुकास्पद असल्याचे सांगितले. तसेच मेकअप आर्टिस्ट रुपाली सोलंकर यांनी पार्लरमधील सेवांची माहिती दिली त्यामध्ये या पार्लरमध्ये फेशियल, हेअरस्टाईलिंग, मेकअप, स्किन ट्रीटमेंट, आणि नेल आर्ट यांसारख्या प्रगत सेवा उपलब्ध असून, आधुनिक उपकरणे आदींच्या सहाय्याने ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. स्नेहलता ब्युटी पार्लर ग्रामीण भागातील सौंदर्य सेवांसाठी एक नवा मापदंड ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. उद्घाटन सोहळ्यात कोकळगाव येथील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

### नमस्कार ..

पावसाचा दुखावला
कुणी कधी अहंकार
अस्वस्थ असा कसा
मातवितो हाहाःकार

कुठेकिती बरसायचे
बोले माझे अधिकार
अल्लडसा श्रावणही
प्रथम पाही हे प्रकार

शस्त्र सरी सातत्याने
मेघगर्जनेचा टण्कार
भयाभीत पक्षीप्राणी
स्वताचं होई शिकार

कठीणसमयीसदृश्य
माणूसकी अलंकार
लाखो हात मदतीला
निसर्ग पाहे चमत्कार

कितीकरी विध्वंस तू
कसा चाले स्वाहाकर
घेई वरुणा शिकवण
जागा अजून सहकार

एकजुट कार्यात मग्न
ज्ञातअज्ञात मदतगार
शब्दआता थिटे झाले
सहज जुळे नमस्कार

संकट समयी जाणवे
मसिहा कैकचिक्कार
मनुष्याचे रुप धारितो
ईश्वर असून निराकार

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# जयक्रांती महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय तलवारबाजी क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** : येथील जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय व स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी आंतर विभागीय आंतर महाविद्यालयीन तलवारबाजी (मुले व मुली) क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन सिनेट सदस्य तथा प्राचार्य डॉ. दीपक बच्चेवार यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. पी. एन. देशमुख, प्रा. डॉ. महेश बेंबडे, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, प्रा. डॉ. सतीश डांगे, प्रा. डॉ. संगीता घार हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. गोविंदराव घार हे होते. यावेळी बोलताना डॉक्टर पी एन देशमुख म्हणाले की खेळाडूंना लॉ ऑफ अट्रॅक्शन लागू होतो. सामान्यपणे जे आपल्याला प्राप्त व्हावे असे वाटते त्यामध्ये यशोशिखरावर पोहोचण्यासाठी आपण जे प्रयत्न करतो त्यात यश हे नक्कीच मिळत असते. विज्ञानाची मते खोटे ठरतील अशा काही चमत्कारिक गोष्टी या खेळात घडत असतात. त्यांनी या मताच्या पुरस्कारासाठी संशोधक मादाम क्युरी यांचे उदाहरण दिले. यावेळी बोलताना उद्घाटक डॉ. दीपक बच्चेवार म्हणाले की, खेळाडूंनी केवळ मार्कासाठी खेळात भाग घेऊ नये तर, त्यात आवडीने व कठीण परिश्रम करण्याची तयारी ठेवून भाग घ्यावा. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये खेळाला महत्त्व प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. केशव आलगुले व प्रा. डॉ. गीता वाघमारे यांनी केले तर आभार प्राध्यापक शिवराज बाजुळगे यांनी मानले. यावेळी बहुसंख महाविद्यालयाचे खेळाडू, प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक उपस्थित होते. या स्पर्धा संपन्न झाल्यानंतर बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य प्रशांत घार व संस्थेच्या सहसचिव सौ. छायाताई घार यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉक्टर श्रीधर कोल्हे हे होते. यावेळी विजेत्या खेळाडूंना सुवर्ण रजत कास्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच मुलांमध्ये सांघिक विजेते पद हे प्रथम बी.पी.एड. कॉलेज उदगीर, द्वितीय महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर, व तृतीय बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत तर मुलींमध्ये प्रथम महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर, द्वितीय यशवंत महाविद्यालय, नांदेड व तृतीय बी.पी.एड.कॉलेज, उदगीर यांनी यश प्राप्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग काम**

**निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-15** **तारीख:** १८.०८.२०२५ डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत: **परिसरासह कामाचे नाव:** सोलापूर विभागातील कुर्डूवाडी-मिरज विभागातील विविध ठिकाणी विविध स्थानांचे जंक्शन बॉक्स, मुख्य सहाय्यक सिग्नल पोस्ट, ईसी पोल आणि सॉकेट्स इत्यादींचे रंगकाम आणि इतर सुधारणा कामे. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ६३,५४,०१४.३५. **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य. **जमा करावयाची बयाणा रक्कम:** रु. १,२७,१००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ०६ महिने. **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** १०/०९/२०२५ रोजी १५.३० वा. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

APEX-65 **डीआरएम/एस अँड टी शाखा मध्य रेल्वे, सोलापूर**

**रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है**


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६